दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–६७ | सोमवार दि.१७ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

विवेकशीलता लोप पावतेय...

समाजमाध्यमांवरील रिल्समुळे मुलांच्या एका टोळीने रील टाकणाऱ्या मुलाचा खून केल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये नुकतीच उघडकीस आली. ज्याचा खून झाला तो व त्याच्या मित्रांनी समाजमाध्यमांवर टाकलेल्या रीलमधील मजकुरावरून वाद झाले होते. त्याचे पर्यावसान खुनात झाल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. अशीच घटना नाशिकमध्ये देखील घडली होती.

एमएचटी सीईटी निकाल जाहीर, ३७ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाइल

मुंबई : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा सेल एमएचटी सिइटी परीक्षा २०२४ चा निकाल रविवारी जाहीर करण्यात आला. यात ३७ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाइल मिळाले. यामध्ये पीसीबीतील १७ आणि पीसीएम मधील २० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यार्थी त्यांची ओळखपत्रे वापरून निकाल तपासू शकतात. विद्यार्थ्यांना त्यांचे स्कोअर कार्ड पाहण्यासाठी रोल नंबर, हॉल तिकीट क्रमांक आणि जन्मतारीख यांसारखी माहिती द्यावी लागेल. पोर्टलवर ही सर्व माहिती प्रविष्ट केल्यानंतर, निकाल स्क्रीनवर दिसेल.

खासदारकी, आमदारकीपेक्षा शेतकरी चळवळ महत्वाची

» खचून जाऊ नका, निखारा पेटता ठेवा-राजू शेट्टी

सोलापूर । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये. चळवळीचा निखारा पेटता ठेवून राज्यभर विविध प्रश्नासाठी आंदोलने व मोर्चे चालूच ठेवावेत असे वक्तव्य स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केले. खासदारकी, आमदारकीपेक्षा शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी चळवळीचा मुकूट

आपल्या डोक्यावर शोभून दिसतो असेही राजू शेट्टी म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर राजू शेट्टी यांनी रविवारी स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि पक्षाच्या राज्य कार्यकारणीची बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी खचून न जाता चळवळीचा निखारा पेटता ठेवावा असे राजू शेट्टी म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेची राज्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक आयोजीत करण्यात आली होती. दरम्यान, बारामती येथे २२ आणि २३ जून रोजी स्वाभिमानीची राज्य कार्यकारणीची बैठक असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. शेतकरी आंदोलन आणि चळवळीशी प्रतारणा न करता चळवळ प्रामाणिकपणे करावी. शिवाय स्वाभिमानीचे राजकारण वेगळ्या पध्दतीने करावे, अशा पध्दतीची भुमिका मांडण्यात आली. तसेच कार्यकर्त्यांना खचून न जाण्याच्या सूचना देखील यावेळी शेट्टींनी दिल्या.

दुष्काळ, अवकाळीने मोठे नुकसान, आंदोलन करणार

सध्या राज्यामध्ये दुष्काळ, अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले असून महागाईमुळे शेतकरी पिचला गेला आहे. यामुळे कांदा, सोयाबीन, कापूस, ऊस, द्राक्ष, संत्रा, डाळींब, धान, मका उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून मोर्चे व आंदोलने करून शेतकऱ्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवायचा आहे. याकरिता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी, प्रदेशाध्यक्ष प्रा. जालंदर पाटील व संदीप जगताप यांच्या नेतृत्वात विविध प्रश्नावर राज्यभर दौरे सुरू करण्यात येणार आहेत.

ईव्हीएम हॅक करता येत नाही

निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन ही पूर्णपणे स्वतंत्र प्रणाली आहे. तिला अनलॉक करण्यासाठी ओटीपीची गरज लागत नाही, त्यामुळे ईव्हीएम हॅक करता येत नाही, अशी माहिती मुंबई उत्तर–पश्चिम लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी रविवारी (दि.१६ जून) पत्रकार परिषदेत दिली.

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनवरून (ईव्हीएम) पुन्हा एकदा वाद निर्माण झाला असून, यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे नेते आमने–सामने आले आहेत. निवडणूक आयोगाकडून मुंबई उत्तर–पश्चिम लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत ईव्हीएम नेमकं कसे काम करते या संदर्भात माहिती दिली. ईव्हीएम छेडछाड प्रकरणात मुंबई उत्तर–पश्चिम लोकसभा ◀◀ पान २ वर

काय आहे प्रकरण ?

मुंबई पोलिसांनी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे खासदार रवींद्र वायकर यांचे मेहुणे मंगेश पांडिलकर यांच्यावर ईव्हीएम प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. बंदी असतानाही मंगेश पांडिलकर यांनी मुंबईतील गोरेगाव निवडणूक केंद्रात मोबाईल फोन वापरल्याचा आरोप आहे. पंडिलकर यांना मोबाईल फोन दिल्याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या एका कर्मचाऱ्यावरही गुन्हा दाखल केला आहे, या प्रकरणी उत्तर पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या अनेक उमेदवारांच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या होत्या. त्या आधारे हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघअवघ्या ४८ मतांनी विजयी झाले होते. यंदाच्या लोकसभा निवडणुकीतील महाराष्ट्रातील हा सर्वात कमी फरकाने विजय नोंदला गेला आहे.

ईव्हीएम एक ब्लॅक बॉक्स–राहुल गांधी

नवी दिल्ली : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केला आहे. रविवार दि. १६ जून रोजी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्टद्वारे त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या पोस्टमध्ये त्यांनी शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्याशी संबंधित एक बातमीही शेअर केली आहे. त्यांच्यावर ईव्हिएम मध्ये छेडछाड करुन विजयी झाल्याचा आरोप आहे. राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, ''ईव्हीएम हा भारतातील 'ब्लॅक बॉक्स' आहे. त्यांची तपासणी करण्यास कोणालाही परवानगी नाही.

संसद भवन संकुलातून महापुरुषांचे पुतळे हटवल्याने काँग्रेस संतप्त

नवी दिल्ली । वृतसंस्था

संसदेच्या आवारातील महापुरुषांचे पुतळे हलवण्याचा निर्णय सत्ताधारी यंत्रणेने 'एकतर्फी' घेतला होता. यामध्ये महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांचा समावेश होता. हे पुतळे येथून हलवणे हाच सत्ताधारी गटाचा एकमेव उद्देश होता, असा आरोप काँग्रेसने रविवारी (दि.१६) केला.

उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखर यांनी 'प्रेरणा स्थळ' चे उद्घाटन केले. त्याआधी विरोधी पक्षाने हा हल्ला केला. ज्यामध्ये स्वातंत्र्यसैनिक आणि इतर नेत्यांचे सर्व पुतळे असतील, जे यापूर्वी संसदेच्या संकुलात विविध ठिकाणी ठेवण्यात आले होते. काँग्रेसने पुतळे त्यांच्या सध्याच्या ठिकाणाहून हटवण्याच्या निर्णयावर टीका केली आहे, तर लोकसभा सचिवालयाने म्हटले आहे की, ते वेगवेगळ्या ठिकाणी ठेवल्याने अभ्यागतांना ते व्यवस्थित पाहणे कठीण झाले आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सांगितले की, पोर्ट्रेट आणि पुतळ्यांवरील संसदेच्या समितीची शेवटची बैठक १८ डिसेंबर २०१८ रोजी झाली होती. यानंतर १७ व्या लोकसभा कार्यकाळात त्याची पुनर्रचनाही झाली नव्हती. संवैधानिक उपसभापती या पदाशिवाय हा पहिलाच बार कार्यरत होता. पुढे ते म्हणाले, ''संसदेच्या संकुलातील पुतळ्यांच्या पुनर्रचनाचे उद्घाटन होत आहे. हा स्पष्टपणे सत्ताधाऱ्यांनी एकतर्फी घेतलेला निर्णय आहे, महात्मा गांधींचा पुतळा एकदा नव्हे तर दोनदा हटवण्यात आला आहे,'' असे रमेश यांनी सोशल मिडीया एक्सवर एका पोस्ट करत म्हटले आहे. रमेश म्हणाले की, आंबेडकर जयंती साजरी करण्याला संसदेच्या संकुलात आणि प्रेरणास्थळावर महत्त्व असणार नाही. कारण, त्यांचा पुतळा आता महत्त्वाच्या ठिकाणी नाही. दरम्यान, संसद भवन ◀◀ पान २ वर

जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा झिरो टेरर प्लॅनचे आदेश

नवी दिल्लीः मागील काही दिवसांपासून जम्मू–काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. जम्मू–काश्मीरमधील सुरक्षेबाबात रविवारी (दि १६) उच्चस्तरीय सुरक्षा बैठक झाली.

राज्यात झिरो टेरर प्लॅननुसार काश्मीर खोऱ्यात मिळालेल्या यशाची सुरक्षा दलांनी पुनरावृत्ती करावी. जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादाला चोख प्रत्युत्तर द्या. कोणत्याही किंमतीवर दहशतवाद रोखलाच पाहिजे, असे निर्देश देत केंद्र सरकार दहशतवाद्यांवर कारवाईसाठी कटिबद्ध असल्याचेही अमित शहा यांनी सुरक्षा ◀◀ पान २ वर

भाजप ५०० पार गेला तरी देशाला हिंदूराष्ट्र घोषित करू शकत नाही

अमोल मिटकरींचे भाजपला प्रत्युत्तर

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक निकालानंतर भाजपाला चांगलाच धक्का बसल्याचे पाहायला मिळत आहे. ४०० पारचा नारा दिला असला तरी प्रत्यक्षात मात्र २४० जागांवर भाजपाला समाधान मानावे लागले. एनडीएला जनतेने स्पष्ट बहुमत दिले असून, मित्र पक्षांच्या मदतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तिसरी टर्म सुरू झाली आहे. यातच आता पुन्हा एकदा भाजपाच्या एका नेत्याने, ४०० पार झालो असतो, तर देशाला हिंदू राष्ट्र घोषित केले असते, असे विधान केले आहे. या विधानावरून नवा वाद निर्माण होण्याची शक्यता असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी यावर जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

भाजपा नेते टी. राजा यांनी भिवंडी येथील धर्मसभेत बोलताना, आपल्याला सरकारचे हात मजबूत करायला हवेत. एकनाथ शिंदे हिंदू राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांना या माध्यमातून सांगू इच्छितो की महाराष्ट्रच नाही तर पूर्ण देशाचा हिंदू तुमच्यासोबत आहे. तुमच्या आजूबाजूला काही सेक्युलर किडे बसले आहेत. पण त्यांच्याबाबतीत तुम्ही विचार करू नका. जो हिंदूंच्या हितावर बोलेल, तो महाराष्ट्रावर राज्य करेल. ◀◀ पान २ वर

अन्यथा मी राजकारण सोडून देईन...

पंकजा मुंडे यांचे समर्थकांना भावनिक आवाहन

आत्महत्या केलेल्या तरूणाच्या कुटुबियांचे सांत्वन करताना अश्रू अनावर

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतील पंकजा मुंडे यांचा पराभव त्यांच्या समर्थकांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. त्यामुळेच, गेल्या १० दिवसांपासून बीड जिल्ह्यात तणावाचे वातावरण असून, दोन युवकांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. आष्टी तालुक्याती युवक पोपट वायभासे यानेही आपले जीवन संपवले होते. पंकजा मुंडेंनी रविवारी वायभासे कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीवेळी पीडित कुटुंबियांचे सांत्वन करताना पंकजा मुंडेंनाही अश्रू अनावर झाले. यावेळी त्यांनी समर्थकांना भावनेच्या आहारी जावून असे न करण्याचे आवाहन केले. ◀◀ पान २ वर

१०० दिवसांत परिस्थिती बदलू

पराभवाने, विजयाने मी हरणारी नाही, पण अशा गोष्टी मला हादरवून टाकतात. हे प्रसंग पाहून मी स्वतः खूप अस्वस्थ आहे. आत्महत्या करायला खूप हिंमत लागते, तुम्ही ती हिंमत पुढचे शंभर दिवस माझ्यासाठी द्या, आपण सगळे पुन्हा पलटून दाखवू, असेही पंकजा मुंडेंनी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना म्हटले.

नीट प्रकरणाची सर्वोच्च न्यायालय नियुक्त अधिकाऱ्यांकडून चौकशी व्हावी–कपिल सिब्बल

नवी दिल्ली । वृतसंस्था

नीट परीक्षेच्या गोंधळाची सर्वोच्च न्यायालय नियुक्त अधिकाऱ्यांकडून चौकशी करावी, अशी मागणी माजी केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी रविवारी (दि.१६) केली. भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी परीक्षा आयोजन पद्धतींबाबत केंद्र सरकारने सर्व राज्यांशी सखोल चर्चा करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कपिल सिब्बल यांनी 'नीट' परिक्षेच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही निशाणा साधला. कोणत्याही परीक्षेत परीक्षा घेणारी संस्थाच भ्रष्ट झाली तर पंतप्रधानांनी मौन बाळगणे योग्य नाही, असे सिब्बल म्हणाले. येत्या संसदेच्या अधिवेशनात विरोधी पक्षांनी हा मुद्दा जोरदारपणे मांडावा, अशी मागणीही ◀◀ पान २ वर

विधानसभेत राष्ट्रवादी ८० ते ९० जागांवर लढवणार – प्रफुल्ल पटेल

गोंदिया । वृतसंस्था

जुन्या राष्ट्रवादी पक्षाकडून आमच्याकडे एकूण ५७ आमदार होते. ही गोष्ट लक्षात घेता महायुतीतून आपल्या पक्षाकरीता विधानसभेच्या ८५ ते ९० जागा मागण्यात येणार असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या जागांवर लढणार असल्याचे सूचक वक्तव्य माजी केंद्रीय मंत्री, खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केले. तसेच गोंदिया विधानसभेतही पक्षाला जागा मिळविण्यासाठी सकारात्मकता दर्शवली.

लोकसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच खा. पटेल गोंदियात आले ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१५ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : २.०० क्विंटल	२,३५१	२,८०१	२,५७६
ज्वारी/हायब्रिड :१८.५० क्विंटल	२,१००	२,४७०	२,३२०
मूग : ०.५० क्विंटल	७,२३०	७,२३०	७,२३०
तूर : १.५० क्विंटल	९,४०१	९,४०१	९,४०१
उडीद : ९.५० क्विंटल	२,३३२	२,६००	२,४४४
बाजरी: ६.०० क्विंटल	२,३००	२,५९०	२,४८४
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: २३.५० क्विंटल	४,४२५	४,४५०	४,४३७
हरभरा: २.५० क्विंटल	४,२००	६,४५२	५,३२६

विद्यार्थ्यांना एसटी पास आता थेट शाळेत मिळणार...!

एसटी प्रशासनाचा निर्णय, व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

शाळा– महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी– विद्यार्थिनींना आता एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळा–महाविद्यालयात वितरित करण्यात येणार आहेत. तसे आदेश एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिले आहेत.

नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा आता सुरू झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६% इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३% रक्कम भरून विद्यार्थ्यांना

मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनाकडून पास घेतले जात असत. पण यंदापासून विद्यार्थ्यांना पाससाठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही असे डॉ माधव कुसेकर यांनी सांगितले. पुढे बोलताना कुसेकर म्हणाले की, शाळा –महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही. या संदर्भात १८ जुन पासून एसटी प्रशासनातर्फे '' एसटी पास थेट तुमच्या शाळेत '' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी – विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी– विद्यार्थिनींना होणार आहे.

अग्रलेख

विवेकशीलता लोप पावतेय...

समाजमाध्यमांवरील रिल्समुळे मुलांच्या एका टोळीने रील टाकणाऱ्या मुलाचा खून केल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये नुकतीच उघडकीस आली. ज्याचा खून झाला तो व त्याच्या मित्रांनी समाजमाध्यमांवर टाकलेल्या रीलमधील मजकुरावरून वाद झाले होते. त्याचे पर्यावसान खुनात झाल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. अशीच घटना नाशिकमध्ये देखील घडली होती.

रिल्सनी युवापिढीला वेड लावले आहे. ते कुठल्याही थराला जाताना आढळते. कधी रील बनवण्याच्या नादात ते करणाऱ्यांचा जीव जातो तर कधी त्यांचा जीव दूसरा कोणीतरी घेतो. वेडाचे टोक म्हणजे खून करतानाचे रिल्स देखील टाकले जातात. त्याच्यावर माणसे त्यांचे मत मांडतात. अनेकदा आत्महत्या करतानाचे रिल्स फिरतात. घाईगडबडीत माणसे त्याला देखील लाईक करताना आढळतात. हा समाजमाध्यमांचा गैरवापर तर आहेच. पण त्याहीपेक्षा समाजाला बधिरपण येत चालले असावे का? आत्महत्या, खून यांचे चित्रीकरण पाहूनही माणसे अस्वस्थ आणि त्याच्या विरोधात व्यक्त होत नसतील तर ते जास्त धोकादायक ठरणारे आहे. युवा पिढीतील अनेकांमध्ये यासंदर्भातील वाढती असंवेदनशीलता हा देखील चिंतेचा विषय ठरावा. प्रसिद्धी आणि लाईक मिळवण्याच्या नादात मुल्यांना दिली जाणारी तिलांजली समाज आणि मुलांच्या पालकांसाठी अनेकार्थांनी चिंतेची ठरावी. पालकांनी मुलांच्या वाढीकडे लक्ष दिले, त्यांच्याशी संवाद राखला तर मुलांमधील बदल त्यांच्या लक्षात येऊ शकतील असे मानसतज्ञ सुचवतात. बहुसंख्य पालक समाजमाध्यमे वापरतात. पण ती डोळसपणे वापरली जातात याची खात्री किती पालक देऊ शकतील? मुलांच्या समाजमाध्यमांवरील जगात काय सुरू आहे, मुलांची मुशाफिरी कोणत्या साईट्सवर सुरू आहे, मुले कोणत्या प्रकारच्या मजकुराला लाईक करतात हे देखील पालकांनी जाणून घ्यायला हवे. त्यासाठीचे मार्गदर्शन तज्ज्ञ आणि सामाजिक संस्था करतात. त्याला सकारात्मक प्रतिसाद देण्याची गरज पालकांना देखील भासायला हवी. आमच्या मुलावर आमचा विश्वास आहे, तो असले काही करणार नाही असे अनेक पालक ठासून सांगतात. तथापि असा भ्रम जोपासण्यापेक्षा काळजी घेणे अधिक फायद्याचे ठरू शकेल. समाजमाध्यमांमुळे दोन चेहऱ्याने वावरण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या माध्यमांची एक काळी बाजू देखील आहे. मुले त्याच्या जाळ्यात अडकणारच नाहीत असे मानणे चुकीचे ठरू शकेल. अनुचित घटना घडून गेल्यानंतर काळजी घेण्यापेक्षा आधीच सावध होण्यातच पालक आणि त्यांच्या मुलांचे हित दडले आहे. समाजमाध्यमांचा वापर करता येणे म्हणजे साक्षरता हा सायबर साक्षरतेचा अगदी संकुचित अर्थ ठरावा. त्याचे चांगले आणि वाईट परिणाम समजून घेऊन त्याच्या विवेकपूर्ण साक्षरतेला पर्याय नाही हेच खरे. केवळ मुलांवरच परिणाम होतो आहे असे नाहीतर या रिल्स फॅडमुळे अनेक संसार उद्ध्वस्त होऊ लागल्याचे दिसत आहेत. याबाबत अनेक वेळा आणि अनेक ठिकाणी चर्चा होतात मात्र त्यातून मार्ग निघताना दिसत नाही. खरे तर यातून मार्ग निघणे तसे अवघड आहेच कारण इथे पुन्हा व्यक्ती स्वातंत्र्य, स्वतःचे अस्तित्व, दुसऱ्याचा दबाव अशा अनेक बाबी समोर येताना दिसतात. यासाठी समाज प्रबोधन महत्वाचे तर आहेच पण आपण कशाला पाठिंबा द्यायचा आणि कशाला टाळायचे हे ओळखायला शिकले पाहिजे.

महसूल एक्शन मोडवर परंतू पोलिसांचे सहकार्य मिळेना

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा पोलिस ठाणे हद्दीत सुरळेगाव व राक्षसभूवन परिसरात मोठ्या जोमात वाळू उपसा होत असल्याची माहिती आहे तसेच गेवराई महसूलचे प्रमुख तहसिदार संदिप खोमणे यांच्या आदेशाने तालूक्यातील अनेक रस्ते जे गोदापात्रात जातात आणि त्या रस्त्यावरूण अवैध वाळू वाहतूक केली जाते असे रस्ते बंद करण्यात येत आहेत व महसूल वाळू माफिया विरूद्ध कठोर भूमिका घेत आहे तसेच चकलांबा पोलिसांकडून या मोहिमेसाठी सहकार्य मिळत नसल्याने मोहिमेला आढथळा येत आहे.

चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील अनेक गावांत अवैध वाळू तस्करीमुळे कायदा व सुवैस्था बिघडत चाललेली आहे गेल्या दोन दिवसापुर्वीच राक्षसभूवन गोदापात्रातून जप्त केलेली वाळू चोरीला गेल्याची फिर्याद दाखल करण्यात आली परंतू महसूल प्रशासन वाळू माफिया विरोधात कार्यवाईला कमी पडते अशी शंका उपस्थित केली जात होती परंतू असे नाही अवैध वाळू तस्करी याला खतपाणी घालण्याचे काम पोलिस प्रशासनाकडून होत आहे हे आता निश्चित झाले आहे आता राक्षसभूवन वगळता वाळू माफियांनी आपला मोर्चा हा सुरळेगाव परिसराकडे वळवण्यात आला आहे तसेच हिंगणगाव परिसरात कार्यवाई करत असताना दोन वाळू माफियांनी महसूल पथकासोबत हज्जत घातली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला असल्याची फिर्याद पोलिसांत दाखल करण्यात आली आहे तसेच चकलांबा परिसरात आपण एकही कार्यवाई करणार नाही तसेच चकलांबा ठाणेदार यांच्या झूकेगा नहीं साला च्या भूमिकेला वरिष्ठही वैतागले असून लवकरच या ठाण्याचा कारभार चांगल्या अधिकाऱ्यांकडे सोपण्यात येईल.अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.

अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद जमीन विक्री प्रकरणी मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे तक्रार!

वफ्फ अधिकारी लक्ष देत नसल्याने वर्षाताई जगदाळे यांची थेट अल्पसंख्याक मंत्राकडे तक्रार!

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री करणाऱ्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. बीड व छत्रपती संभाजी नगर तसेच मुंबई येथील वफ्फ कार्यालयात पुरावे सहित तक्रार करूनही अधिकारी लक्ष देत नसल्याने अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे अंबाजोगाई येथील प्रकरणाची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी तक्रार केली आहे.

अंबाजोगाई येथील वफ्फ संस्था मज्जिद संगीन मौजे अंबाजोगाई यांची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र अनुक्रमांक एक पार्ट बी पान क्रमांक ६० व ६१ यामध्ये १९७४ पासून नोंद असून दर्गेचे सेवेसाठी एकूण१० सर्वे नंबर क्षेत्र २७६ एकर १८ गुंठे सेवेसाठी बहाल करण्यात आले होते. सदरील इनाम जमीन काही भूमाफियांनी संगणमत करत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या लाखो रुपयात खरेदी विक्री केलेली आहे. सदरील जमीन खरेदी विक्री प्रकरणी महाराष्ट्र निर्माण सेना मागील अनेक दिवसापासून पाठपुरावा करत आहे. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ कार्यालयात संबंधित खरेदी विक्रीचे सर्व कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे .या गंभीर बाबीची दखल छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ अधिकारी घेत नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे संगीन इनामी जमीन प्रकरणात थेट कारवाई करावी व संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.

मंत्री अब्दुल सत्तार जातीने लक्ष देणार!

अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे संगीन मस्जिद इनाम जमीन खरेदी विक्री प्रकरणाची सखोल चौकशी करत कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे. प्रकरणाची गंभीर दखल अल्पसंख्याक मंत्रालयने घेतली असून या प्रकरणात जातीने लक्ष देऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई केली जाईल अशी अपेक्षा मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे वर्षाताई जगदाळे यांनी व्यक्त केला आहे.

गो.कु.यो.कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

अंबाजोगाई । पतिनिधी

श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शालेय समितीच्या अध्यक्षा ॲड.कल्याणी विर्धे,शालेय पदाधिकारी, एस.ओ.क्षीरसागर यांच्यासह इतर शिक्षिका,शिक्षक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक देऊन नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताता ॲड.विर्धे म्हणाल्या की, योगेश्वरी शिक्षण संस्थेची यशाची परंपरा उज्वल आहे विद्यार्थीनींनी अभ्यास करून ही परंपरा जतन करावी व नाव उज्वल करावे असे सांगितले. विद्यालयातील विद्यार्थिनी पहिल्याच दिवशी मोठ्या आनंदात दिसत होत्या.

भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय मांग वडगाव येथे नवागतांचे पुष्पगुच्छ व पुस्तके देऊन स्वागत

केज । प्रतिनिधी

भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय मांग वडगाव तालुका केज या शाळेत आज नविन शैक्षणिक वर्षातील पहिल्या दिवसाचेऔचित्य साधून शाळेत नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.तसेच शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ मधील इयत्ता १० वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवार दिनांक १५ जुन २०२४ रोजी संपन्न झाला.

या वर्षी शाळेतुन परीक्षे साठी ४४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.यात ३८ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून तर ६ विद्यार्थी प्रथम श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाले.या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा शाळेच्या वतीने आयोजितकरण्यात आला होता.या कार्यक्रम प्रसंगी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा पुष्पहार,पुष्पगुच्छ देऊन व पेढे भरवून सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घेऊन आपले व आपल्या कुटुंबाचे व गावाचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रम प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक व धारुर तहसील कार्यालयातील अव्वल कारकून श्री. बालासाहेब फरके हेनियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने शाल, पुष्पहारघालून सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक लिंबराज अण्णा फरके, शाहु बप्पा इंगळे, आदर्श शिक्षक देशपांडे गुरुजी, बालासाहेब फरके, आबासाहेब जाधव, शरदरावपत्की, अशोक इंगळे,उमेश इंगळे, रामहरी काटे,रामराजे जाधव, सोमनाथ इंगळे,हरिभाऊ बरडे, बबलू इंगळे, सौ.शामल उमेश इंगळे, सौ.सिंधुबाईबापुराव थोरबोले तसेच गावातील असंख्य शिक्षणप्रेमी नागरिक, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.गुणगौरव सोहळ्याचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. खोसे डी.एस.यांनी भुषविले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री.रंजितकुमार वाघमारे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील जेष्ठ शिक्षक डोईफोडे सर,चव्हाण सर,राऊत सर,मैंद्रे सर, भापसे सर, मुंडे सर, माऊली बालसदनचे अधिक्षक मनोज पाटील,लिपिक पारवे सर, शाळेतील सेवक विजय कुमार इंगळे व संतराम लांडगे यांनी अथक परिश्रम घेतले.

जामखेड वरून धाराशिव येथे कत्तलीसाठी जाणाऱ्या पाच जणावरांची सुटका, तीन जणांविरोधात गुन्हा दाखल

जामखेड । प्रतिनिधी

बकरी ईदच्या अनुषंगाने खर्डा येथे चेक पोस्टवर खर्डा पोलीसांना संशयास्पद पीकअप टेम्पो आढळला तपासणी अंती खर्डा पोलीसांना पाच जनावरे आढळली. कसलाही परवाना नसताना राजरोस पणे जामखेड वरून धाराशिव येथे कत्तलीसाठी जनावरे चालली होती. त्यांची सुटका करत तीन जणांविरोधात खर्डा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खर्डा पोलीस स्टेशन हद्दीत बकरी ईद अनुषंगाने खर्डा टोल नाका येथे चेक पोस्टे लावण्यात आलेले आहे. सदर ठीकाणी वाहने चेक करत असताना जामखेड येथुन आलेली पिकअप टेम्पो क्रं. -४४-९३०३ यामध्ये जामखेड येथुन धाराशिव येथे, ०१ क्राँस जातीचा काळ्यारंगाचा बैल, १ पांढर्या रंगाचा खिल्लार जातीचा बैल, १ तांबडया रंगाचा गीर जातीचा बैल, १ तांबडया रंगाचा गीर जातीचा बैल, ०१ क्राँस जातीचा काळ्या रंगाचा बैल असे बळजबरीने भरून कत्तली करीता घेऊन जात आहेत अशी माहीती मिळाल्याने. १) अजमुद्दीन नईमुद्दीन काजी वय ३८ वर्ष रा .गाजिपूरा धाराशिव ता.जि.धाराशिव, २) नवनाथ भुजंग पेठे व ३८ वर्षे रा.गावसुत तालुका जिल्हा धाराशिव, ३) इर्शाद पठाण राहणार धाराशिव यांना सदर जणावरांबाबत विचारपुस केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तर दिल्याने व सदर चे जणावरे कत्तलीसाठी चालले आहेत असे समजल्याने सदर ची कारवाई करण्यात आली सदर कारवाईमध्ये एकुण २,८७,०००=०० /- रूपये किंमतीचे ५ बैल व पिक अप गाडी जप्त करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, पोलीस उपअधिक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, कर्जत विभाग विवेकानंद वाखारे, यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली खर्डा पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल संभाजी शेंडे, पोलीस कॉन्स्टेबल शशी म्हस्के ,पोलीस कॉन्स्टेबल अशोक बडे, पोलीस कॉन्स्टेबल विष्णु आवारे, पोलीस कॉन्स्टेबल बाळु खाडे , पोलीस कॉन्स्टेबल वैजिनाथ मिसाळ यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल संभाजी शेंडे हे करत आहेत. शनिवारी जामखेडचा बाजार असतो परिसरात जनावरांचा बाजार प्रसिद्ध आहे. येथे मोठ्या प्रमाणात जनावरांची खरेदी विक्री होते. यातच कत्तलीसाठी गुरांची मोठ्या प्रमाणावर खरेदी होते व वेगवेगळ्या ठिकाणी पाठवले जातात.

बीड : मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संयज हांगे यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करताना मराठी पत्रकार परिषदेचे सुभाष चौर, विशाल साळुंके, विलास डोळसे, रवि उबाळे, पत्रकारमित्र संजय मिसाळ आदी.

पान १वरून...

संसद भवन संकुलातून महापुरुषांचे

संकुलातील मान्यवर आणि इतर अभ्यागतांना या मूर्ती एकाच ठिकाणी सहज पाहता याव्यात, त्यांना आदरांजली वाहावी यासाठी 'प्रेरणा स्थळ' तयार करण्यात आल्याचे लोकसभा सचिवालयाने म्हटले आहे.

ईव्हीएम हॅक करता

मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा सूर्यवंशी म्हणाल्या, ''ईव्हीएमला ओटीपी लागत नाही, त्यामुळे एव्हीएम हॅक होऊ शकत नाही. लोकसभा निवडणुकीवेळी संबंधित मतदारसंघात सहआरोपी गुरव हे डेटा ऑपरेटर होते. त्यांच्यावर आम्ही पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. पोलिस याचा सविस्तर तपास करत आहेत, असेही त्या म्हणाल्या.

अन्यथा मी राजकारण

अन्यथा मी राजकारण सोडून देईन असे त्यांनी म्हटले. पंकजा मुंडेंनी पोपट यांच्या पत्नी व मुलांचे सांत्वन केले, त्यावेळी पंकजा मुंडेंना धाय मोकलून रडताना पाहून सर्वच भावूक झाले होते. कुटुंबियांनी टाहो फोडताच, उपस्थितांचेही डोळे पाणावले. या भेटीनंतर माध्यमांशी बोलतानाही पंकजांचा कंठ दाटला होता. त्यावेळी, पंकजा यांनी सर्वच कार्यकर्ते आणि समर्थकांना उद्देशून आवाहन केले. मी मुंडेसाहेबांनंतर समाजाला आणि कार्यकर्त्यांना कुटुंबापेक्षाही जास्त जीव लावला. लोकांनीही मला एवढा जीव लावला की, माझ्या पराभवानंतर ते जीव देत आहेत, पण हे मला मान्य नाही. मी स्वतःचे संतुलन बिघडू दिले नाही. मी कधीही भूमिका कमकुवत घेतली नाही. पण, या आत्महत्येच्या घटनांमुळे मी कमकुवत झाले आहे. मला खूप अपराधी वाटत आहे. कारण, माझ्यावर प्रेम करणाऱ्या माणसाला मी काहीच देऊ शकत नाही, अशा शब्दात पंकजा मुंडेंनी कार्यकर्त्यांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. जय-पराजय अनेक झाले, मुंडेसाहेबांचा पराभव झाला, विलासराव देशमुख साहेबांचाही झाला. पण, पराभव एवढे जिव्हारी लागण्याचे कारण ही आत्ताची परिस्थिती आहे. माणसाला स्वतःच्या नजरेत इतकं लहान करू नका, आणि त्यांचा जीव ज्या नेत्यांमध्ये आहे त्यांनाही करू नका, त्यांना स्वतःचे जीव द्यावे लागतील अशी परिस्थिती निर्माण करू नका, अशी माझी विनंती आहे., असे पंकजा यांनी म्हटले. मला वाटतं की इतकं प्रेम कोणत्याच नेत्यावर कोणी करू नये की, त्यांनी त्याच्यासाठी स्वतःचा जीव द्यावा. जर तुम्हाला हिंमतीने लढणारा नेता हवाय तर मला सुद्धा हिंमतीने लढणारा कार्यकर्ता हवा आहे. नाहीतर मी राजकारण सोडून देईन, अजून जर कोणी जीव दिला तर. कारण, राजकारणामुळे हे होतेय असे मला वाटते, असे म्हणत पंकजा मुंडेंनी समर्थकांना आवाहन केले आहे. मी सगळ्यांच्या पाया पडून सांगते काही करा पण स्वतःचा जीव देऊ नका, असेही त्यांनी म्हटले.

भाजप ५०० पार गेला तरी देशाला

हिंदू एकत्र आले तर हिंदू राष्ट्र बनेल हे आम्ही सांगतो. यावेळी निवडणुकीत जर आपण ४०० पेक्षा जास्त जागा जिंकल्या असत्या, तर हिंदू राष्ट्र घोषित झाले असते. मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत हिंदू राष्ट्रासाठी प्रयत्न करत राहीन, असे टी. राजा यांनी म्हटले आहे. यावर अमोल मिटकरी यांनी प्रत्युत्तर दिले. अमोल मिटकरी यांनी एक्सवर एक पोस्ट करत टी. राजा यांच्या विधानाला उत्तर दिले. टी. राजाला या देशात लोकशाही नांदते व या देशाला संविधान आहे हे कदाचित माहीत नसावे. हा अखंड भारत आहे व तो अखंड भारत राहील. ग्लानिर्भवती भारत हा कृष्णाचा उपदेशसुद्धा टी. राजा विसरला असावा. पुढे एक व्हीडीओ शेअर करत अमोल मिटकरी म्हणाले की, टी. राजा या एका व्यक्तीने ४०० पार गेलो असतो तर हे हिंदूराष्ट्र झाले असते, असा अजब दावा केला आहे. कदाचित टी. राजाला हे माहिती नसावे की, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला संविधान दिले. या संविधानाच्या चौकटीत राहून या देशाचे नाव भारत म्हणजे स्वतंत्र भारत राष्ट्र हेच नाव देण्यात आले आहे. ४०० पार नाही, तुम्ही ५०० पार जरी गेला असतात, तरी या देशाला हिंदूराष्ट्र कोणीही घोषित करू शकत नाही, असा इशारा अमोल मिटकरी यांनी दिला. दरम्यान, या धर्मसभेत बोलताना टी. राजा यांनी वक्फ बोर्ड रद्द करावा, अशी मागणी केली. महाराष्ट्रात १ लाख एकर जमीन वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे. भारतात १० लाख एकर जमीन वक्फ बोर्डकडे आहे. पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांनी वक्फ बोर्ड कायदा संपवून टाकावा. वक्फ बोर्डाच्या जमिनीवर हिंदूंसाठी रुग्णालये, क्रीडांगण, महाविद्यालये, घरे बनवावीत, असे आवाहन टी. राजा सिंह यांनी केले.

जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा

बैठकीत स्पष्ट केले. जम्मू-काश्मीरमधील सुरक्षेबाबात आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सुरक्षा बैठक झाली. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे, लेफ्टनंट. जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विधानसभेत राष्ट्रवादी ८० ते ९०

असता रविवारी (दि.१६) गोंदिया येथील नमाद महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार मनोहरराव चंद्रिकापूरे उपस्थित होते. खा. पटेल यांनी लोकसभा निवडणुकीत भंडारा-गोंदिया व गडचिरोली-चिमूर मतदारसंघातून निवडून आलेले काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे व डॉ. नामदेव किरसान यांचे अभिनंदन करून हे लोकसभा क्षेत्रातील नागरिकांच्या समस्या दूर करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर महाराष्ट्रात एनडीए मागे राहण्याचे कारण म्हणजे विरोधकांनी चुकीचा प्रचार केला, त्यामुळे अनेक ठिकाणी आम्ही मागे राहिलो, अशी खंतही प्रफुल पटेल यांनी यावेळी व्यक्त केली.

नीट प्रकरणाची सर्वोच्च न्यायालय नियुक्त

त्यांनी केली. केंद्रीय शिक्षण मंत्री आणि सरकार परीक्षेत भ्रष्टाचार किंवा गोंधळ झाल्याचे मान्य करणार नाही. सीबीआयच्या तपासात सर्व काही उघड होईल, त्यामुळे या प्रकरणाचा तपास सत्ताधाऱ्यांद्वारे नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून होणे गरजेचे आहे. अशी मागणी कपिल सिब्बल यांनी केली. तसेच राज्यसभेतही हा मुद्दा मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भीषण अपघातात ८ सैनिक गंभीर जखमी, एकाचा मृत्यू

नागपूर । प्रतिनिधी

कन्हान (ता. पारशिवनी) शहरातून साहित्य खरेदी केल्यानंतर कामठी शहरात येत असलेल्या सैनिकांच्या ऑटोला विरुद्ध दिशेने वेगात जाणा-या ट्रॅव्हल्सने जोरात धडक दिली. यात एका सैनिकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर सात सैनिक आणि ऑटोचालक असे आठ जण गंभीर जखमी झाले. ही घटना कामठी (जुनी) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कन्हान नदीच्या पुलावर रविवार दि. १६ जून सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली.

विघ्नेश असे मृत सैनिकाचे नाव आहे. कामठी शहरातील सैनिक प्रशिक्षण केंद्रातील काही सैनिक साहित्य खरेदी करण्यासाठी कन्हानला गेले होते. खरेदी आटोपल्यानंतर त्यांनी दोन ऑटोने परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. एमएच-४९/एआर-७४३३ क्रमांकाचा ऑटो कन्हान नदीच्या पुलावर पोहोचताच नागपूरहून शिवनी (मध्य प्रदेश) येथे वेगात जाणा-या एमएच-३१/एफसी-४१५७ क्रमांकाच्या ट्रॅव्हल्सने ऑटोला जोरात धडक दिली. यात ऑटोतील आठ सैनिकांसह चालक गंभीर जखमी झाला. मागून दुस-या ऑटोने येत असलेल्या सैनिकांनी सर्व जखमींना लगेच कामठी सैनिक प्रशिक्षण केंद्राच्या हॉस्पिटलमध्ये नेले. तिथे प्रथमोपचार केल्यानंतर पाच सैनिकांसह ऑटो चालकास नागपूर शहरातील मेयो रुग्णालयात हलविण्यात आले तर तिघांना कामठी शहरातील खासगी हॉस्पिटलमध्ये भरती केले. मेयो रुग्णालयात एका सैनिकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर तिघांना नागपुरातील मेडिकल हॉस्पिटलच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये भरती करण्यात आले. या तिघांच्या डोक्याला गंभीर दुखापत असल्याच माहिती डॉक्टरांनी दिली. याप्रकरणी कामठी (जुनी) पोलिसांनी ट्रॅव्हल्स चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.१७ जून २०२४

लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शाळा प्रवेशोत्सव निमित्त; प्रभातफेरी, मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण

लिंबागणेश । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील सर्व शाळा काल दि.१५ जुन पासुन सुरु झाल्या आहेत.नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यासाठी प्रवेश पात्र मुलांना प्रवेश देणे,त्यांना शाळेत टिकवुन गुणवत्ता पुर्ण शिक्षण देण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्याअनुषंगाने सकाळी ढोल,घोषणा फलकासह गावातुन प्रभातफेरी काढण्यात आली.नव्याने प्रवेशित होणा-या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मोफत पाठ्यपुस्तके वितरण समारंभ घेण्यात आला.कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक अमर पुरी, भरत चौरे,संदिपान आगाम,श्रीमती कुलकर्णी ,सुवर्णा आयाचित यांनी केले होते.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,शाळाप्रेमी नागरीक, पालक,शिक्षक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणार -प्रा.टी.पी.मुंडे

आमरण उपोषणाला वडीगोद्री गावामध्ये जाऊन दिला पाठिंबा!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

ओबीसींच्या प्रश्नासाठी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री गावामध्ये प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ आबा वाघमारे हे आमरण उपोषण करत आहेत.ओबीसीच्या न्याय हक्कासाठी तसेच आरक्षणाच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणार असल्याचे प्रतिपादन ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी केले. या आमरण उपोषणाला त्यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शवला.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाच्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी व समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यासंदर्भात उपोषण केले होते. परंतु त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी सरकारला एक महिन्याचा कालावधी दिला असल्याने उपोषण स्थगित केले त्याच्या विरोधात ओबीसीचे नेते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ आबा वाघमारे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. ओबीसीचे आरक्षण हे कायद्याच्या चौकटीमध्ये बसणारे असून ते आरक्षण मराठा समाजाला देता कामा नये व सगेसोयरे कायद्याला विरोध या दोन्ही मागणीसाठी जालना येथील वडीगोद्री या गावांमध्ये गेल्या तीन दिवसापासून सुरू आहे. याच आंदोलनाला ओबीसी बहुजन पार्टीचा पाठिंबा दर्शवण्यासाठी प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी आंदोलनस्थळी भेट घेतली. सरकारने मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्यावे परंतु ओबीसी मध्ये आरक्षण दिल्यास सरकारला ओबीसी समाज त्यांची जागा दाखवून देईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

या अगोदर सुद्धा मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे व सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी यासाठी राज्य सरकारकडे मागणी केली होती परंतु त्यांच्या आंदोलनाला प्रतिउत्तर म्हणून आणि ओबीसीचे आरक्षण आबादीत ठेवण्यासाठी ओबीसीचे महाराष्ट्रातील नेते त्यामध्ये छगन भुजबळ , प्रकाश अण्णा शेंडगे, प्रा.टी.पी.मुंडे सर यांचा सिंहाचा वाटा आहे. २२ एल्गार सभा घेऊन ओबीसी समाजामध्ये जनजागृती निर्माण केली त्यांनी जरांगेच्या मागणीला कडाडून विरोध दर्शवला परिणामी सरकारने मराठा समाजास वेगळे दहा टक्के आरक्षण दिले परंतु आता सुद्धा पुन्हा जरांगे यांनी तीच मागणी केल्याने ओबीसी समाज प्रचंड आक्रमक झाला आहे. त्यामुळे राज्य सरकारने मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्यास ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

हायर इलेक्ट्रॉनिक्स वार्षिक मिट मोठ्या उत्साहात संपन्न

परळी । प्रतिनिधी

हायर इलेक्ट्रॉनिक व निसर्ग एजन्सी आयोजीत लातूर जिल्हा डीलर मीट लातूर येथील कॉर्नीवॉल रीसोर्ट मध्ये मोठ्या उत्पाहात संपन्न झाली. यावेळी हायर कंपनीच्या नवीन वशिंग मशीनचे अनावरण यावेळी अनेक मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.विशेष बाब म्हणजे निसर्ग एजन्सीचे संचालक अमरीश कुसुमकर हे मूळचे परळी येथील रहिवासी असून इलेक्ट्रॉनिक्स व्यापार क्षेत्रात लातूर जिल्ह्यात मोठे प्रस्थ निर्माण केले आहे.

हायर इलेक्ट्रॉनिक कंपनी आणि लातूर जिल्हा वितरक निसर्ग एजन्सी यांच्यावतीने लातूर जिल्ह्यातील डीलर यांची वार्षिक मिट लातूर येथील कॉर्नेवॉल रिसॉर्ट येथे संपन्न झाली यावेळी हायर इलेक्ट्रॉनिक कंपनीचे पश्चिम विभागाचे क्षेत्रीय अधिकारी बलवंत डिग्गी , विक्री विभागाचे व्यवस्थापक अमित कुमार, मार्केटिंग हेड नितीन शेंडे, सर्व्हिस मॅनेजर महेश कोलते ,प्रोडक्त ट्रेनर हितेशकुमार, लेखाविभाग प्रमुख पद्माकर कुलकर्णी, किचन प्रोडक्ट विभाग प्रमुख कुंभार,विभागीय व्यवस्थापक संतोष गुरमे, लातूर जिल्हा प्रमुख वितरक निसर्ग एजन्सीचे अमरीश कुसुमकर,राजकुमार सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वर्षीच्या डीलर मिट मध्ये व्यापाऱ्यांचा विविध अडचणी आणि समस्या यावर चर्चा करण्यात आली.या प्रसंगी उत्कृष्ट कार्य केलेल्या डीलरचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच हायर कंपनीकडून नुकतेच बाजारात आणण्यात आलेल्या २० वर्ष ग्राहकांना वारंटी असलेल्या फ्रंट लोड १०.५ किलोग्राम वजन क्षमतेच्या वशिंग मशीनचे अनावरण यावेळी मोठ्या दिमाखदार पद्धतीने करण्यात आले.या वार्षिक मिट मद्धे लातूर जिल्ह्यातील डीलर मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी निसर्ग एजन्सीकडून ५ दिवसीय विदेश सफर डीलरकरिता जाहीर करण्यात आली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हायर इलेक्ट्रॉनिक चे सर्व अधिकारी कर्मचारी तसेच लातूर जिल्ह्यातील प्रमुख वितरक असलेल्या निसर्ग एजन्सीचे सर्व कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

पीककर्जाचे पुनर्गठन न करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कृषीमंत्री धनंजय मुंडे काय कारवाई करणार?-आपेट

अंबाजोगाई । प्रतिनीधी

अंबाजोगाई जि.बीड दुष्काळी उपाययोजना करण्यात बीडचे पालकमंत्री तथा कृषीमंत्री धनंजय मुंडे अपयशी ठरले आहेत.१० नोव्हेंबर २०२३ रोजी एकनाथ शिंदे सरकारने दुष्काळी उपाय योजना घोषित केल्या.त्याला बीडच्या अधिकाऱ्यांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली. तरिहि बीड जिल्ह्यातील बँक अधिकाऱ्यांनी पीक कर्जाचे 'नवं-जुनं' करण्याचा सपाटा लावला.पीक कर्जाचे पुनर्गठन करून नव्याने पीक कर्ज दिले नाही. भ्रष्ट आणि झुंडशाहीच्या कारभारामुळे अधिकाऱ्यांवर पालकमंत्र्यांचा वचक राहिला नाही का?शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर धनंजय मुंडे कारवाई करण्याची हिंमत करणार का? असा सवाल शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केला आहे.

यावर्षी पावसाला रोहिणी,मृग नक्षत्रात सुरुवात झाली आहे.बीड जिल्ह्यात सुमारे ५० हजार हेक्टर पेरणी उरकली तरिही राष्ट्रीयकृत, ग्रामीण, खाजगी आणि सहकारी बँकांनी पीक कर्जाचे वाटप केले नाही.शेतकऱ्यांनी खाजगी सावकाराकडून उधार,उसनवारी करून पेरणी सुरू केली आहे. राष्ट्रीयकृत, ग्रामीण, खाजगी आणि सहकारी बँकांनी पीक कर्जाचे 'नवं- जुनं' करण्याचा सपाटा लावला आहे. पुनर्गठन करून नवीन पीक कर्ज मागणाऱ्या शेतकऱ्यांना बँक अधिकाऱ्यांनी गहाणखत करायला सांगितले. तसेच पुनर्गठीत कर्ज घेतल्यास तुमचे 'सिबिल' खराब होणार असल्याचा खोटा प्रचार बँक अधिकाऱ्यांनी केला.शेतकऱ्यांनी सुमारे तीन वर्षापासून सोयाबीन विकलेले नाही.अनेकांचा कापूस विक्री विना घरात पडून आहे. ऐन उन्हाळ्यात दरवर्षीप्रमाणे दुधाचे भाव प्रति लिटर १० ते १५ रुपयांनी दूधसंघांनी कमी केले आहेत.वैद्यनाथ,पनंगेश्वर,अंबासाखर कारखान्यांनी थकीत ऊस बिले,मालक तोडीची बिले,कामगारांची देणी दिलेली नाहीत. याकडे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे जाणून-बुजून दुर्लक्ष का करीत आहेत? सन २०१८ सालातील सोयाबीनची सुमारे ३५ हजार शेतकऱ्यांची ६७ कोटी रुपयेपीक विमा नुकसान भरपाईची रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि पुणे यांना परत केली.सन २०२० साली मंजूर करण्यात आलेली पीक विम्याची रक्कम धाराशिव परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळाली मात्र बीड जिल्ह्यात अजून मिळालेली नाही. फळबाग,अतिवृष्टी आणि दुष्काळी अनुदानासाठी सतत के.वाय.सी. करण्यास सांगितले जाते. बँक अधिकाऱ्यांच्या अशा मनमानी कारभारामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. धनंजय मुंडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे कृषीमंत्री असताना १० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही? धनंजय मुंडे बँकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? असा सवाल शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केला आहे.

मिलनासाठी सज्ज झाल्या गोगलगायी; प्रतिबंधात्मक उपाययोजना करा -येळकर

अंबाजोगाई प्रतिनिधी

सद्यस्थितीत समाधानकारक पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणीस प्रारंभ केला आहे. मागील दोन वर्षांपासून काही भागांमध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली होती यावर्षी गोगलगायीचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी गोगलगाय व्यवस्थापन अनुषंगाने शेतकऱ्यांनी करावयाच्या उपाययोजनांची माहिती देण्याच्या दृष्टीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर, प्रकल्प संचालक आत्मा सुभाष साळवे, उपविभागीय कृषी अधिकारी अशोक सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाच्यावतीने व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून कृषी सहाय्यक पंडित काकडे व उपविभागीय तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी अंजनपूर, धानोरा, सातेफळ, ममदापूर, कुंबेफळ इत्यादी ठिकाणी शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन मार्गदर्शन केले. येळकर यांनी सद्यस्थितीत बांधाच्या कडेने निदर्शनास येत असलेल्या गोगलगायी व त्यांचे होत असलेले मिलन निरीक्षणे शेतकऱ्यांना दाखवून गोगलगायींचा विस्तार होऊ नये यासाठी त्या तात्काळ वेचून नष्ट करणे आवश्यक आहे याची माहिती दिली तसेच सोयाबीन उगवून आल्यानंतर गोगलगायींचा प्रादुर्भाव होऊन नुकसान होऊ नये यासाठी एकात्मिक पद्धतीने गोगलगाय व्यवस्थापनाच्या उपाययोजना सुचवल्या.

असे करा गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन.

१. सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या पाण्यात बुडवून नष्ट कराव्यात.२. शेतामध्ये सात ते आठ मीटर अंतरावर विविध ठिकाणी गोणपाट किंवा वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग ठेवावेत. गोगलगायी दिवसा त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्यास्तापूर्वी त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून नष्ट करावी.३. शेत किंवा बागेच्या सभोवती बांधापासून आत तंबाखू भुकटीचा पाच सें.मी. रुंदीचा पट्टा गोगलगायींना शेतात जाण्यास प्रतिबंध म्हणून व नियंत्रणासाठी टाकावा.४. शेतामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव झाला तर सोयाबीनच्या चार ओळीनंतर ओळीच्या बाजुने ५ फुट अंतरावर मेटाल्डिहाईड २.५ टक्के घटक असणारे स्नेलकील या कीडनाशकाच्या गोळ्या तुकडे करून शेतामध्ये व बांधाच्या कडेने फेकाव्यात. पाऊस पडल्यानंतर सदर कीडनाशकाची कार्यक्षमता कमी होत असल्याने एकाच वेळी सर्व कीडनाशक शेतामध्ये टाकू नये. गोळ्यांची हाताळणी करताना हातमोजे वापरावेत, गोळ्या टाकल्यापासून किमान सहा ते सात दिवस अन्य प्राणी शेतापासून दूर राहतील, याची काळजी घ्यावी.

शिवप्रसाद येळकर, तंत्रज्ञान समन्वयक,उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय अंबाजोगाई.

गोगलगाय उद्रेक टाळणे आपल्या हातात.

सध्या काही गावांत गोगलगाय बांधाच्या कडेने दिसून येत आहेत. तसेच गोगलगायी सध्या मिलन अवस्थेमध्ये निदर्शनास येत आहेत. याचा भविष्यकाळात उद्रेक टाळायचा असेल तर शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन यास मोहीम स्वरूपात उपाय करायला हवेत.

पंडित काकडे, कृषी सहायक.

कृषी निविष्ठा अनुदान मिळवण्यासाठी करा अर्ज.

सोयाबीन पिकासाठी नॅनो डीएपी नॅनो युरिया तसेच गोगलगाय व्यवस्थापनासाठी शिफारशीतील मेटाल्डिहाईड कीडनाशक अनुदानित स्वरूपात मिळवण्यासाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर १२ जून ते २३ जून पर्यंत शेतकऱ्यांनी

शहरात चोरांचा सुळसुळाट; अंकुश नगर,कालिका नगर या भागात गस्त वाढवावी, येथील नागरिकांची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांमध्ये मागील सात ते आठ दिवसांमध्ये चोरीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे बंद असलेली घरे मुख्यतः चोरांच्या रडावारावर असतात माणसांना बांधून दरोडा टाकतात कोणाचीही भीती न बाळगता बिनधास्त चोऱ्या करत असून पोलीस प्रशासन यांची कसल्याही प्रकारची भीती न बाळगता चोऱ्या होत असून शहरातील अंकुश नगर कालिका नगर लोकाशा नगर या भागामधील नागरिक भयभीत असून रात्रभर स्वतः

जागून भीतीमुळे काढत आहेत असे अतिरेक पोलीस अधीक्षक साहेब यांची भेट घेऊन या भागातील नागरिक सोबत घेऊन निवेदन देण्यात आले रात्रीची गस्त वाढवावी आणि नागरिकांना भयमुक्त करावे यावेळी अंकुश नगर, कालिका नगर, लोकाशा नगर, या भागातील नागरिक कांच्या १०० ते १५० सह्या असलेले निवेदन देण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खा. बजरंग सोनवणे यांचा नंदू खरात मित्र मंडळाच्या वतीने सत्कार

मादळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापुर सर्कल चे युवा नेते नंदू नाना खरात मित्र मंडळ उमापुर सर्कलच्या वतीने नवनिर्वाचित खा, बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या सत्कार करण्यात आला, यावेळी शिवसेना सोशल मीडिया तालुका उप प्रमुख दादासाहेब खरात, एकनाथ खरात मुक्तारभाई शेख, शैलेश भाऊ गोरडे, नवनाथ आबा पारे अमरसिंह बने संग्राम दादा गंगाधर, रामेश्वर भोसले, यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते,

गेवराई तालुक्यातील उमापुर सर्कल चे युवा नेते नंदु नाना खरात मित्र मंडळ उमापुर वतीने बीड जिल्हाचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांचा ह्रदय सत्कार केज येथे करण्यात आला, यावेळी खा, बजरंग बाप्पा सोनवणे यांनी गेवराई तालुक्यातील अत्यंत चांगले मत्याधिक्य दिल्याने माझा विजय झाल्याचे यावेळी सांगितले, विशेष म्हणजे नंदु नाना खरात मित्र मंडळाचे खुप आभारी असल्याचा आवर्जून उल्लेख खासदार सोनवणे यांनी केला उमापुर सर्कल चे युवा नेते,नंदु नाना खरात मित्र मंडळ उमापुर यांच्या वतीने शिवसेनेचे सोशल मीडिया उप प्रमुख दादासाहेब खरात , एकनाथ खरात, मुक्तारभाई शेख, शैलेश भाऊ गोरडे, नवनाथ आबा पारे, अमरसिंह बने, संग्राम दादा गंगाधर, रामेश्वर भोसले यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

पान ६ वरून...

परळी महापारेषणचा विक्रम

व २२० के. व्ही. परळी पीजीसीआईएल पॉवरग्रिड सर्किट-या विद्युत वाहनीचे काम अवघ्या नऊ दिवसात पूर्ववत केली. या कामाकरिता नांदेड प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता शशिकांत दिवाकर, लातूर प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक गडदे, ४०० के. व्ही (संवसु.) गिरवली विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल जोशी, अ.उ.दा (संवसु.) बीड विभागाचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे, अ.उ.दा (संवसु.) लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश जायभाय, मेजरस्टोअर धारशिव कार्यकारी अभियंता संजीव चाटे तसेच अतिरिक्त कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत दगडगुंडे, संतोष चव्हाण, प्रशांत चव्हाण, सचिन चव्हाण, महेश नडगिरे, दिलीप फेरे, उप-कार्यकारी अभियंता संदीपान नगरगोजे, नितीन मुंडे, ऋषिकेश नायगावकर, डी. बी. मारलापल्ले, सहाय्यक अभियंता राजेश तिडके तसेच परळी मंडळातील वेगवेगळ्या वाहिनी उपविभागातील लाईनस्टाफ सर्वश्री. अमजत संगतराज, कैलास आतमवाड, पंकज भागवत, शत्रुघ्न गाढवे, वैजनाथ फड, संजय पोखरकर, प्रशांत मसने, प्रवीण टाकळगावे, सिद्धेश्वर गिते, धनंजय झिरमिळे, एस.डी. माळी, व्ही.एच. राठोड, ए.बी. सगर, आर.डी. बचाटे, ए.वी. होळकर, जि.बी.माळी, यस. यस. सुकेवार, जि.बी. गवारे, यन.बी. कसपटे, के.ए. गुरव यांनी दिवस-रात्र मनोऱ्याची पायाभरणी व उभारणी करिता देखरेख केली.काम लवकर पूर्ण होण्यासाठी अभियंते व कर्मचारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी तळ ठोकून होते.या कामी मे. सोमेश्वर विद्युत या कंपनीचे संचालक चंद्रकांत गिते, पर्यवेक्षक रामेश्वर आपेट व त्यांच्या चमुने दिवसरात्र काम केले तसेच मनुष्यबळ वाढवण्याकरिता नांदेड व परतुर येथून सुजाता एलेक्ट्रिकल्स व निळशिखा यांच्या अतिरिक्त टीम मागवण्यात आल्या.या मनोराच्या पुनर्रउभारणी कार्यामुळे सदर वाहिनीद्वारे होणारा विद्युत पुरवठ पूर्ववत झाला महापारेषण कंपनीच्या तांत्रिक टीमचे आणि अभियंत्यांचे कार्य कौतुकास्पद ठरले असून, त्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे.

नुकसानग्रस्त उच्च दाब वहिनी ही दुर्गम , डोंगराळ भागात येत असल्याने अनेक उच्च पदस्य अधिकारी, कर्मचारी हे घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळी ठाण मांडून होते.या सर्व अधिकारी, कर्मचारी यांची तात्पुरती निवास आणि भोजन व्यवस्था देखील जागेवरच करण्यात आली.

गुलमोहर बहरला

आहेत. उन्हाळ्याच्या तीव्रतेत ही फुल अधिकच चमकदार दिसतात आणि ती सुंदर फुले मन प्रसन्न करतात गुलमोहराची फुल फक्त सुंदरच आहेत असे नाहीत तर गुलमोहराचे झाड फक्त आपल्याला सावली देत नाही तर हे झाड अनेक प्रकारे फायदेशीर आहे हे आरोग्याशी संबंधित अनेक समस्यावर मात करण्यास मदत होते आणि आयुर्वेदात गुलमोहराचे अनेक औषधी गुणधर्म आहेत उन्हाळ्यात हे झाड गुलमोहराच्या फुलांनी भरलेले असते त्याची फुले खूप सुंदर आहेत गुलमोहराच्या फुलाचे बनवलेले औषध पोटदुखी आणि डायरिया यासाठी उपयोगी आहेत तसेच अनेक वाटसरू गुलमोहरच्या झाडाच्या सावलीत बसून डोळ्यात सामावून ठेवण्यासारखे दृष्ट पाहण्याचा आनंद घेतात गुलमोहरही निसर्गाचं अद्भुत धन आहे. उन्हाळ्यात त्याचे सौंदर्य आपल्या मनाला प्रसन्न करणारे असते.

योग्य वेळी योग्य निर्णय घेवू

क्षीरसागर म्हणाले की, यावर्षी निसर्गानिच कृपा केली आहे, वेळेवर मृगाचा पाऊस पडल्यामुळे आपला शेतकरी बांधव शेतीच्या कामाला लागला आहे. आज सर्वांचा मनापासून आशिर्वाद मिळावा यासाठीच हा मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. व्यासपीठासह समोर असलेल्या हजारोंचा माझा परिवार आहे. कुटूंबाशी आणि प्रत्येकाशी संवाद साधावा म्हणूनच हा कार्यक्रम घेतला आहे. कधी नव्हे ते निसर्गनिही साथ दिली आहे. वेळेवर सर्व कामे होवू लागली आहेत. लोकशाहीत जय-पराजय असतोच पराभवाने खचून जायचे नाही आणि यशाने हुरळून जायचं नाही. हा विचार आम्ही करतो. माझा एक-एक कार्यकर्ता हजार मताचा मालक आहे. हा अनुभव आजचा नाही, पराभवाच्या आणि संकटाच्या काळात हा कार्यकर्ता सोबत राहिला आहे. अपयश आले तर खचून न जाता आपण कुठे कमी पडलो यावर फोकस करून आम्ही पुन्हा नव्या उमेदीने पुढे जात असतो. संकट काळात लोकांच्या मदतीला जाणे हा आमचा पिंड आहे. बीड जिल्ह्यात निसर्गाने अनेकवेळा पाठ फिरवली. बीड जिल्ह्यातील शेती पाण्यावर अवलंबून आहे आणि नेमका हाच प्रश्न आपण सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सत्ता असतांना अनेक गावांमध्ये साठवण तलाव, बंधारे, विहीरी अशी कामे करून त्या भागात शेतकर्यांसाठी महत्वाचे कामे केले आहेत. मराठवाड्याचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे. सोलापुर-धुळे हा मार्ग असो, न्यायालयाची बिल्डींग असो, एस.पी.ऑफीसची बिल्डींग, वीज वितरण विभागामार्फत अनेक गावात सबस्टेशन अशी विविध विकास कामे आज पूर्ण झालेली दिसतील. याचा लाभ ग्रामीण भागातील नागरीकांना झाला याचे समाधान आहे. जुमले आणि जुगाडावर आजचे राजकारण सुरू आहे. नुसता धुरळा सुरू आहे. त्यामुळे फक्त फुफाटा दिसु लागला आहे. आता निर्णायक वेळ आली आहे. सर्वांनी बरोबर राहण्याचा संकल्प करूया. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका पुर्ण ताकदीने लढायच्या आहेत. दुरदृष्टीकोन ठेवूनच आता सर्वजण एक व्हा. आपलं ध्येय लक्षात घ्या. भावनेच्या आहारी जावू नका. पुढच्या प्रवासात खंबीरपणे पाठीशी उभे रहा. राजकारणात आणखी कोणती खिचडी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण सेवाभाव ठेवून काम करूया. प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहु असा विश्वास देत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले. यावेळी राजू कांबळे, शेख इकबाल यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह माजी मंत्री क्षीरसागर गटात प्रवेश केला. सकाळी ११ वाजता आयोजीत करण्यात आलेल्या मेळाव्यात संपूर्ण सभागृह आणि सभागृहाच्या बाहेरचा परिसर खचा-खचा भरला होता. अत्यंत जल्लोष आणि उत्साहात आलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला आत्मविश्वास देवून समर्थ साथ देण्याचे अभिवचन दिले. यावेळी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शिवसंग्रामची बीड शहर

करण्यात आले. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी आगामी काळात झोकून देवून काम करण्याची तयारी ठेवावी तसेच प्रत्येक तरुणांनी बदल करायची हिंम्मत दाखवली पाहिजे . सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्याने अंगी बाणावे असे सांगत डॉ.ज्योतीताई मेटे यांनी त्यांना पुढील वाटचालीस व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी साधनाताई दातखिळ,संगीताताई ठोसर, अशोक लोकरे,अनिकेत देशपांडे,प्रशांत डोरले,शेख अखिल भाई, शेख कुतुब भाई, शेख आबेद भाई, मुकुंद गोरे, कैलास शेजाळ, शेख लालाभाई, शकील खान शैलेश सुरवसे, अशोक ढोले, प्रकाश तावरे, शेख रहीम यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

१८ जूनला शेतकऱ्यांना मिळणार २०,००० कोटी

देशातील ९.२६ कोटी शेतकऱ्यांना मिळणार लाभ

शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. येत्या १८ जूनला म्हणजे मंगळवारी शेतकऱ्यांना खात्यात पैसे जमा होणार आहेत. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी वारणसी येथून हा हप्ता शेतखऱ्यांच्या खात्यात वितरीत करणार आहेत. यावेळी पंतप्रधान शेतकऱ्यांसाठी २०,००० कोटी रुपये हस्तांतरीत करणार आहेत. याचा देशातील ९.२६ कोटी शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी याबाबतची माहिती दिली.

दरम्यान, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना सुरु केल्यापासून केंद्र रकारनं देशभरातील ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना ३.०४ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित केली आहे. आत्तापर्यंत या योजनेच्या माध्यमातून १६ हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. १८ जून रोजी १७ हप्ता वितरीत करण्यात येणार आहे. या हप्त्याच्या माध्यमातूर सरकार दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची आर्थिक मदत करते. प्रत्येत चार महिन्याला २००० रुपयांचा हप्ता वितरीत केला जातो. १६ वा हप्ता २८ फेब्रुवारीला शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला होता. देशातील ९.२६ कोटी शेतकऱ्यांना १७ व्या हप्त्याचा लाभ मिळणार आहे.

तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसीत येणार

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १८ जून रोजी सत्ता हाती घेतल्यानंतर पहिल्यांदाच त्यांचा लोकसभा मतदारसंघ वाराणसीला भेट देणार आहेत. यादरम्यान, ते देशभरातील ९.२६ कोटी लाभार्थी शेतकऱ्यांसाठी २०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या -किसान योजनेचा १७ वा हप्ता जारी करतील. मोदी स्वयं-सहायता गटांच्या ३०,००० हून अधिक सदस्यांना प्रमाणपत्रे देखील देतील ज्यांना कृषी सखी म्हणून प्रशिक्षण देण्यात आले आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.

पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले

पंतप्रधान मोदींनी गेल्या दोन टर्ममध्ये शेतीला नेहमीच प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी घेतले. पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यानंतर, मोदीजींनी सर्वप्रथम - किसान योजनेचा १७ वा हप्ता जारी करण्यासंबंधीच्या फाइलवर स्वाक्षरी केल्याचे चौहान म्हणाले. या अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी तीन समान हप्त्यांमध्ये वार्षिक ६,००० रुपये मिळतात. योजना सुरू केल्यापासून केंद्राने देशभरातील ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना ३.०४ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित केल्याचे चौहान म्हणाले. दरम्यान, वाराणसी येथे होणाऱ्या कार्यक्रमात उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राज्याचे विविध मंत्री सहभागी होणार आहेत.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने विकसित केले

'ट्रॅक्टरचलित हळद काढणी यंत्र'

अकोला : हळद काढणीसाठी आता ट्रॅक्टरचलित हळद काढणी यंत्र विकसित करण्यात आले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांनी हे यंत्र विकसित केले असून, यामुळे आता हळद काढणीसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचा प्रश्न सुटणार आहे. या यंत्राला वापरण्यासाठी समितीने मान्यता दिल्याने राज्यासह पश्चिम विदर्भात हळदीच्या पेऱ्यात वाढ होण्यास आता मदत होणार आहे. शिवाय हळद काढणीसाठी लागणारा वेळ, मनुष्यबळाचा खर्च याची बचत होणार आहे. हळद हे एक फायदेशीर पीक असून सुद्धा काढणीसाठी एकूण पीक उत्पादनाच्या खर्चात जवळपास ३० ते ४० टक्क्यापर्यंत खर्च येत असल्याने शेतकरी हे पीक घेताना विचार करतात कारण एकूण उत्पादन खर्चापैकी या पिकाच्या काढणीला जवळपास आठपट जास्त मजूर लागतात. हळद पिकाची काढणी मजूरांच्या सहाय्याने केली जाते. या पिकाची व्यावसायिक उपयोगीता बघता हळद काढणी यंत्र प्रभावी ठरणार आहे. या कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांच्या मार्गदर्शनात शास्त्रज्ञ डॉ. विवेक खांबलकर यांनी हे यंत्र विकसित केले आहे. सन २०१९-२० मध्ये देशात हळद पिकाखाली एकूण २.१८ लक्ष हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी ०.५५ लक्ष हेक्टर क्षेत्र फक्त महाराष्ट्रात होते. महाराष्ट्र हे तेलंगणानंतर हळद पिकाखालील क्षेत्रानुसार देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. सन २०२१-२२ मध्ये राज्यात हळद लागवडीखालील एकूण क्षेत्र सुमारे ८४०६६ हेक्टर होते. हळदीची लागवड आणि काढणीचे काम मोठे जिकरीचे आहे यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळही मिळणे कठीण होत असल्याने हळदीच्या लागवडीत हा मोठा खोडा होता. या पार्श्वभूमीवर अकोल्याच्या डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने हळद काढणी यंत्र विकसित केले आहे.

हळद काढणी यंत्राची वैशिष्ट्ये आणि फायदे :

ट्रॅक्टरचलित हळद काढणी यंत्रामुळे श्रम आणि वेळेची बचत होणार. हळद काढणी जलद होणार. विशेष म्हणजे गादी वाफ्यावरील हळद काढण्यासाठी हे यंत्र उपयुक्त आहे. या यंत्राची कार्यक्षमता ९८.७२ टक्के एवढी आहे. हे यंत्र मजबूत आणि टिकाऊ असून, वापरण्यास सुलभ आहे.

वर्षभरात भाजीपाल्याच्या किंमतीत ८१ टक्क्यांपर्यंत वाढ!

भाजीपाल्याच्या किमतीत दिवसेंदिवस वाढच होताना दिसत आहे. गेल्या वर्षभरात अन्न धान्याच्या महागाईत कोणतीही घट झालेली नाही. वेगवेगळ्या भाजीपाल्याच्या किमतीत जसे बटाटा, कांदा आणि टोमॅटोच्या किंमतीत ८१ टक्क्यांपर्यंत वाढ झालेली आहे. गेल्या १५ दिवसात कांद्याच्या घाऊक भावात सुद्धा ५० टक्क्यांपर्यंत वाढ झालेली आहे.

ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, गेल्या वर्षभरात बटाट्याची सरासरी किंमत ६२ टक्क्यांनी वाढली आहे. ३० एप्रिल २०२३ रोजी बटाट्याची किंमत १८.८८ रुपये प्रति किलो होती जी १० जून २०२४ पर्यंत ३०.५७ रुपये प्रति किलो झाली आहे. कांद्याची किंमत ६६ टक्क्यांनी वाढली आहे. ३० एप्रिल २०२३ रोजी कांद्याची किंमत २०.४१ रुपये प्रति किलो होती जी १० जून २०२४ रोजी ३३.९८ रुपये प्रति किलो झाली आहे. टोमॅटोच्या किंमतीत ८१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ३० एप्रिल २०२३ रोजी टोमॅटोची किंमत २०.५५ रुपये प्रति किलो होती जी १० जून २०२४ रोजी ३७.११ रुपये प्रति किलो झाली आहे. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर या भाज्यांच्या किंमती आणखी जास्त आहेत. ३० रुपये प्रति किलो बटाटा ऑनलाइन ४१ रुपये प्रति किलो आणि कांदा ४३ ते ४७ रुपये प्रति किलो पर्यंत विकला जातोय. या सर्वाचा परिणाम म्हणजे भाजीपाल्याच्या वाढत्या किंमतीमुळे सर्वसामान्यांवर बोजा वाढला आहे. व्हेज थाळी महाग झाल्याने लोकांना आहारात बदल करावा लागत आहे. ही परिस्थिती बघता सरकारने तातडीने या समस्येवर उपाय योजना करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेल याची खात्री करणे आवश्यक आहे, त्याबरोबरच महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे.

भरघोस उत्पादन देणारे उडीद पिकाचे सुधारित वाण

मूग आणि उडीद या दोन्हीही पिकांमध्ये विविध सुधारित वाण विकसित करून प्रसारित केले आहे. शेतकऱ्यांनी अधिकचे उत्पन्न घ्यायचे असल्यास शिफारस केलेल्या वाणांची निवड करावी. उडीद पिकाचे भरघोस उत्पादन देणाऱ्या जातीविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊयात.बी डी यू-१ (-१) : हा वाण कृषी संशोधन केंद्र बदनापूर, व.ना.म.कृ.वि.परभणी येथून २००१ मध्ये प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण भुरी रोगास प्रतिकारक असून महाराष्ट्रासाठी शिफारस केलेला आहे. या वाणाचे दाणे हे मध्यम, काळया रंगाचे व टपोरे असून १०० दाण्यांचे वजन ४.५ ते ५.० ग्रॅम एवढे असते. या वाणांमध्ये प्रथिनांचे प्रमाण १९ टक्के इतके असून ७० ते ७५ दिवसांत काढणीस येते. हे वाण मध्यम उंच वाढणारे असून पाने अरुंद व खोड जांभळ्या रंगाचे असते. शेंगा या काळया व चोपड्या असून त्यावर कमी प्रमाणात लव असतो. या वाणाचे सरासरी उत्पादन ११-१२ क्विंटल प्रति हेक्टरी एवढे आहे.टी ए यू- १ (-१) : हा वाण डॉ.प.दे.कृ.वि. अकोला व बी.ए.आर.सी मुंबई यांनी संयुक्तपणे १९८५ मध्ये प्रसारित केला आहे. हे वाण ७० ते ७५ दिवसात काढणीस तयार होतो. हे वाण भुरी रोगास प्रतिकारक आहे. शेंग काळी व चोपडी असून दाणे मध्यम आकाराचे व काळे रंगाचे असून १०० दाण्याचे वजन ३.५ ते ३.८ ग्रॅम इतके असते. या वाणांमध्ये प्रथिनांचे प्रमाण १९ ते २० टक्के आढळून येते. सरासरी उत्पादन १०-१२ क्विंटल प्रति हेक्टरी आहे.टी पी यू-४ (-४) : हा वाण ६५ ते ७० दिवसामध्ये काढणीस तयार होते. हे वाण लवकर तयार होणारे असून महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात राज्यासाठी शिफारस केले आहे. या वाणाचे दाणे काळे टपोरे आहेत. प्रति हेक्टरी उत्पादन १०-११ क्विंटल प्रति हेक्टरी आहे.

महागाईमुळे शेतकरी पिचला गेला-राजू शेट्टी

खासदारकी, आमदारकीपेक्षा शेतकरी चळवळीचा मुकूट डोक्यावर शोभून दिसतो

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये. चळवळीचा निखारा पेटता ठेवून राज्यभर विविध प्रश्नासाठी आंदोलने व मोर्चे चालूच ठेवावेत असे वक्तव्य स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केलं. खासदारकी, आमदारकीपेक्षा शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी चळवळीचा मुकूट आपल्या डोक्यावर शोभून दिसतो असेही राजू शेट्टी म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर राजू शेट्टी यांनी आज स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि पक्षाच्या राज्य कार्यकारणीची बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी खचून न जाता चळवळीचा निखारा पेटता ठेवावा असे राजू शेट्टी म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेची राज्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची आज ऑनलाईन बैठक आयोजीत करण्यात आली होती. दरम्यान, बारामती येथे २२ आणि २३ जून रोजी स्वाभिमानीची राज्य कार्यकारणीची बैठक असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. शेतकरी आंदोलन आणि चळवळीशी प्रतारणा न करता चळवळ प्रामाणिकपणे करावी. शिवाय स्वाभिमानीचे राजकारण वेगळ्या पध्दतीने करावे अशा पध्दतीचे भुमिका मांडण्यात आली. तसेच कार्यकर्त्यांना खचून न जाण्याच्या सूचना देखील यावेळी शेट्टींनी दिल्या.

राज्यामध्ये दुष्काळ, अवकाळी पावसाने मोठे नुकसान

सध्या राज्यामध्ये दुष्काळ, अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले असून महागाईमुळे शेतकरी पिचला गेला आहे. यामुळे कांदा, सोयाबीन, कापूस, ऊस, द्राक्ष, संत्रा, डाळींब, धान, मका उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून मोर्चे व आंदोलने करून शेतकऱ्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवायचा आहे. याकरिता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी, प्रदेशाध्यक्ष प्रा. जालंदर पाटील व संदीप जगताप यांच्या नेतृत्वात विविध प्रश्नावर राज्यभर दौरे सुरू करण्यात येणार आहेत. त्याबरोबरच विधानसभा निवडणुका दोन महिन्यावर आल्याने कोल्हापूर , सांगली , सातारा ,पुणे , सोलापूर , लातूर , नांदेड , परभणी , अमरावती , बुलढाणा , नाशिक , नंदुरबार या जिल्ह्यातील विविध विधानसभेच्या जागेसाठी स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी निवडणुका लढविण्याबाबत तसेच महायुती व महाविकास आघाडीच्या जागावाटपात अनेक चांगले उमेदवारांना तिकीट मिळणार नसल्याने आपापल्या विधानसभा मतदारसंघात सक्षम उमेदवारांची चाचपणी करुन विधानसभेला पुर्ण ताकदीने उमेदवार उभे करण्याची चर्चा झाली आहे. यावेळेस राज्यातील सर्व राज्य कार्यकारणीचे प्रमुख पदाधिकारी ऊपस्थित होते.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६३२ : मुघल बादशाह शहाजहान याची पत्नी मुमताज हिचे निधन. तिच्या स्मरणार्थ शहाजहान याने आग्रा येथे ताजमहलची निर्मिती केली.

१७९९ : फ्रांस सम्राट नेपोलियन बोनापार्ट यांनी इटली देश आपल्या साम्राज्यात सामावून घेतला.

१८८५ : न्यू यॉर्क बंदरमध्ये स्टॅच्यू ऑफ लिबर्टी चे आगमन झाले.

१९१७ : महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी हे साबरमती आश्रमातील हृदय कुंज या टिकाणी रहायला गेले.

१९२९ : सोवियत संघाने चीन बरोबर असणारे आपले राजनैतिक संबंध संपुष्टात आणले.

१९३३ : सविनय कायदेभंग चळवळ मागे घेण्यात आली

१९४० : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी फ्रान्समधुन माघार घेण्यास सुरूवात केली.

१९४४ : आइसलँडने (डेन्मार्कपासुन) स्वातंत्र्य घोषित केले आणि ते प्रजासत्ताक बनले.

१९४४ : जर्मनीने दुसऱ्या महायुद्धात हार मानली

१९६३ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक शाळांतून बायबलचे पठण करणे कायदेबाह्य ठरवले.

१९६७ : चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.

१९७० : शिकागोत पहिल्यांदाच किडनी ट्रान्सप्लॅन्टची शस्त्रक्रिया करण्यात आली

१९७२ : वॉटरगेट कुभांड डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्यालय फोडून कागदपत्रे पळवल्याबद्दल रिचर्ड निक्सनच्या चार साथीदारांना अटक.

१९९१ : भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि पंतप्रधान राजीव गांधी यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर

२००४ : मंगळावर पृथ्वीप्रमाणेच दगड सापडले.

२००८ : 'तेजस' विमानाची पहिल्यांदाच यशस्वी चाचणी करण्यात आली.

२०१२ : भारतीय बॅडमिंटनपटू सायना नेहवाल यांनी इंडोनेशिया ओपन स्पर्धा तिसऱ्यांदा जिंकली.

२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात ढगफुटी होऊन एका दिवसात १३ इंच पाऊस पडला. शेकडो व्यक्ती मृत्युमुखी, हजारो यात्रेकरी अडकले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२३९ : एडवर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ७ जुलै १३०७)

१७०४ : फ्लाइंग शटल चे शोधक जॉन के यांचा जन्म.

१८६७ : लघुलेखन पद्धतीचा शोधक जॉनरॉबर्ट ग्रेग यांचा जन्म.

१८८७ : प्रख्यात भारतीय राजकारणी, मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि केंद्रीय संरक्षणमंत्री तसचं, पश्चिम बंगाल व ओरिसा राज्याचे माजी राज्यपाल कैलाशनाथ काटजू यांचा जन्मदिन.

१८९८ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल हेर्मान यांचा जन्म.

१९०३ : बाबूराव विजापुरे संगीतशिक्षक? (मृत्यू: ७ डिसेंबर १९८२)

१९०३ : चॉकोलेट चिप कुकी चे निर्माते रुथ ग्रेव्हस वेकफिल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९७७)

१९२० : नोबेल पारितोषिक विजेता फ्रेंच जीवशास्त्रज्ञ फ्रांस्वा जेकब यांचा जन्म.

१९७३ : लिअँडर पेस भारतीय टेनिसपटू

१९८० : महान अमेरिकन व्यावसायिक टेनिसपटू वीनस विलियम्स यांचा जन्मदिन.

१९८१ : शेन वॉटसन ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९७ : ज्येष्ठ गुरु संत श्री निवृत्तीनाथ महाराज यांनी त्र्यंबकेश्वर येथे देह ठेवला. (जन्म: २९ जानेवारी १२७४)

१६३१ : शाहजहानची पत्नी मुमताज महल यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १५९३)

१६७४ : राजमाता जिजाबाई (छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री) (जन्म: १२ जानेवारी १५९८)

१८५८ : झाशीच्या राणी लक्ष्मीबाई इंग्रजांच्या विरूद्ध चकमकीत धारातीर्थी.

१८३९ : ब्रिटीश कालीन भारताचे १४ वे गव्हर्नर जनरल(राज्यपाल) लॉर्ड विलियम बेटिंक यांचे निधन.

१८६५ : ब्रिटीश कालीन भारतातील ब्रिटीश गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यांचे निधन.

१८९३ : भारताचे १४ वे राज्यपाल जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर १७७४)

१८९५ : गोपाळ गणेश आगरकर लोकमान्य टिळकांचे सहकारी व 'केसरी'चे पहिले संपादक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य, समाजसुधारक, विचारवंत व शिक्षणतज्ञ, 'सुधारक' या वृत्तपत्राचे संस्थापक व संपादक (जन्म: १४ जुलै १८५६)

१९२८ : पण्डित गोपबंधूदास तथा 'उत्कलमणी' ओरिसातील समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्यसेनानी, कवी व लेखक (जन्म: ९ आक्टोबर १८७७)

१९६५ : मोतीलाल राजवंश ऊर्फ 'मोतीलाल' आपल्या ऐटबाज व्यक्तिमत्त्वाने व सहजसुंदर अभिनयाने रसिकांवर मोहिनी घालणारे अभिनेते (जन्म: ४ डिसेंबर १९१०)

१९८३ : शरद पिळगावकर चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व वितरक (जन्म:)

१९९६ : मधुकर दत्तात्रय तथा 'बाळासाहेब' देवरस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक (जन्म: ११ डिसेंबर १९१५)

२००४ : इंदुमती पारीख, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या.

शिक्षकांची पदोन्नती प्रक्रिया तात्काळ सुरू करा- धनंजय कुलकर्णी

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीड मध्ये सन २०१४ नंतर आजपर्यंत प्राथमिक पदवीधर,विषय शिक्षकांची पदे पदोन्नती प्रक्रिया राबवून भरलेली नाहीत, याचा अत्यंत दुरगामी नकारात्मक परिणाम बीड जिल्ह्याच्या गुणवत्तेवर दिसून येत आहे. ग्रामीण भागात चालणाऱ्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये, गणित व विज्ञान या विषयाचे विषय शिक्षक नसल्याने, मागील दहा वर्ष ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रमाणात शैक्षणिक नुकसान झालेले आहे. प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना ,जिल्हा बीड दरवर्षी याबाबत जिल्हा परिषद बीड कडे पाठपुरावा करत आहे, निवेदने देत आहे . परंतु प्रहारने मागील तीन वर्षात जिल्हा परिषद बीड प्रशासनाकडे आजतागायत विविध विषयांवर दिलेल्या ७० ते ७५ निवेदनांवर काय कार्यवाही करण्यात आली, याबाबत प्रशासनाने कधीच उलट टपाली कळवलेले नाही.ही बाब अत्यंत निषेधार्ह व संतापजनक आहे. प्राथमिक पदवीधर -विषय शिक्षक पदोन्नती हा विषय, नेहमीच जिल्हा परिषद प्रशासनाने न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत,असे सांगून आतापर्यंत टाळलेला आहे. परंतु यामुळे बीड जिल्हयाचे अपरिमित शैक्षणिक नुकसान झालेले आहे. म्हणूनच प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड ने या विद्यार्थी हिताच्या प्रश्नी लक्ष घालत, जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी तात्काळ प्राथमिक पदवीधर,विषय शिक्षक पदोन्नती प्रक्रिया राबवण्याची मागणी जिल्हा परिषद बीड प्रशासनाने सुरू करण्याची मागणी करून जोरदार पाठपुरावा सुरू केला आहे, अशी माहिती जिल्हा प्रवक्त्या निर्मलाताई वाघमारे यांनी दिली आहे.

सन २०१४ साली जिल्हा परिषद बीड ने प्राथमिक पदवीधर- विषय शिक्षक पदोन्नती प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर राबवली होती.त्यानंतर मात्र बीड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये मोठीआवश्यकता असताना व मोठ्या संख्येने गणित व विज्ञान विषयाची पदवीधर शिक्षक उपलब्ध असतानाही, मागील दहा वर्षात एकही विषय शिक्षक नेमण्यात आलेले नाहीत. ऊसतोड कामगारांचा हा जिल्हा, नेहमी मागासच राहिला पाहिजे की



काय?, असा प्रश्न सुशिक्षित नागरिक,पालक ,शिक्षक यांच्या समोर निर्माण झाला आहे आणि ही खंत प्रहार पदाधिकारी यांच्या कडे मोठ्या प्रमाणावर व्यक्त देखील केली जात आहे. म्हणूनच ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना ,जिल्हा बीड ने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या सुरूवातीलाच गणित व विज्ञान विषय शिक्षकांची पदे प्राथमिक पदवीधरांची पदोन्नती प्रक्रिया राबवून तात्काळ ही पदे भरण्याची मागणी, जिल्हा परिषद बीड प्रशासनाकडे केली आहे. उच्च शिक्षणाचा पाया म्हणून इयत्ता ६ वी ते ८ वी चे गणित व विज्ञान विषयांचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे असते, म्हणूनच यावर्षी गणित व विज्ञान विषय शिक्षक तात्काळ नेमण्याचा आग्रह प्रहार ने धरला आहे. सदरील पदोन्नती न झाल्यास,ही विद्यार्थी हिताची मागणी पुर्ण करण्यासाठी जिल्हाभरात व्यापक आंदोलन लवकरच उभा करत आहे,अशी माहिती जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे यांनी दिली आहे. याप्रसंगी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे पदाधिकारी जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी,जिल्हा सचिव- अविनाश काळे कोषाध्यक्ष- उत्तरेश्वर बजगुडे, उर्दू विभाग प्रमुख- मिर्झा हसनात, जिल्हा कार्याध्यक्ष -ओमप्रकाश आणेराव, प्रहार पेन्शनर सेल प्रमुख-सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, प्रहार एज्युकेशन सेल प्रमुख अरविंद चौधरी व अण्णासाहेब खंडागळे, प्रहार जुनी पेन्शन सेल प्रमुख -सुदर्शन काळे ,प्रविणा कांबळे ,प्रहार तक्रार निवारण सेल चे प्रमुख- पी. आर. खेडकर व पुरुषोत्तम खेत्रे ,कार्याध्यक्ष -नवनाथ धोंगडे ,सय्यद मुमताज , वैशाली आकुसकर, सहसचिव अंबादास बागलाने, जिल्हा प्रवक्ता- पद्माकर आंधळे ,मन्मथ अरबने, किरण सारुक, निर्मला वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष-कादरी कदीर, पी. आर. खेडकर, महादेव गीते, शामराव मिरगे ,दिपक देशमुख,प्रल्हाद फड, शेख ऐनोद्दीन ,वर्षाराणी महाजन समन्वयक- संजय पाटील, शामराव आघाव, अण्णासाहेब खंडागळे, शिवाजी झेंडेकर संघटक- प्रविणा कांबळे, बापूसाहेब शिंदे ,अशोक सप्रे, सुरेश वाघमारे, संजय लोखंडे संपर्कप्रमुख- संध्याताई टेकाळे, वसंत तरकसबंद, राजाराम लकडे, राजेंद्र बेले, पांडुरंग जोगदंड , शहादेव मराठे , विठ्ठल सानप,सहसचिव -अंबादास बागलाने ,महेश भट, संजय कुलकर्णी बीड तालुकाध्यक्ष - सय्यद जिलानी, वडवणी तालुकाध्यक्ष - संगीता तिडके,शिरूर कासार तालुकाध्यक्ष- दत्तात्रय गाडेकर, गेवराई तालुकाध्यक्ष - बाळासाहेब गावडे, माजलगाव तालुकाध्यक्ष- लक्ष्मण सरवदे, पाटोदा तालुकाध्यक्ष-मुकींद गाडे, आष्टी तालुकाध्यक्ष भाऊसाहेब काळे, धारूर तालुकाध्यक्ष- हनुमंत मंत्रे, परळी तालुकाध्यक्ष- कमलाकर कामाळे, अंबेजोगाई तालुकाध्यक्ष- बाळासाहेब पिसुरे, केज तालुकाध्यक्ष-प्रभूकांत सोन्ने इत्यादी उपस्थित होते.

थोडक्यात

अवैध देशी दारू विक्री करणाऱ्या वर कारवाई

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड हद्दीत अवैध दारू विक्री करणाऱ्या वर कारवाई करत १०० देशी दारूच्या बाटल्या म्हणजे ३५०० चा मुद्देमालासह आरोपीला ताब्यात घेतला आहे. याबद्दल अधिक माहिती अशी की,पोलिस स्टेशन पेठ बीड गु र न १६६/२४ कलम ६५() नुसार ५० बाटल्या देशी दारू किंमत १७५०/ , रुपये तसेच गू र न १६७/२४कलम ६५() नुसारआरोपी विशाल निवृत्ती जगताप वय ३७ रा हनुमाननगर व नितीन भगवान म्हस्के वय ३० वर्ष हनुमाननगर १०० देशी दारू बाटल्या किमती ३५००/- रुपये अशी रेड करून आरोपी कडून मुद्देमाल जप्त करून पुढील कारवाई सुरू आहे. सदर कारवाई पीआय अशोक मुदीराज, हेड कॉन्स्टेबल हनुमंत उगले, देशमुख आर्दीनी केली आहे

सत्यभामा मुंडे यांचे दुःख निधन

परळी । प्रतिनिधी

भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री,व शिक्षक ज्ञानोबा माऊली मुंडे टोकवाडी यांच्या मातोश्री श्रीमती सत्यभामा उत्तमराव मुंडे वय ८५ वर्ष वृद्धापकाळाने निधन. टोकवाडी येथील भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री शिक्षक ज्ञानोबा माऊली मुंडे यांच्या मातोश्री आहेत. श्रीमती सत्यभामा उत्तमराव मुंडे वार शनिवार दिनांक १५ जुन २०२४ रोजी पहाटे ४.०० वाजता वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली जावई,दोन मुले,सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. अंत्यविधी आज वार शनिवारी सकाळी ९.३० वाजता टोकवाडी येथील स्मशानभूमीत झाला आहे. रिक्षा विधी वार सोमवारी दिनांक १७जुन २०२४ रोजी सकाळी ६.३० वाजता आहे.

नवीन शैक्षणिक वर्षात नवीन संकल्प करून पुर्ततेसाठी प्रयत्न करावा.- डॉ.देशपांडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनो नवीन शैक्षणिक वर्षात नवीन संकल्प करून ते संकल्प पुर्तता करण्यासाठी प्रयत्न करा.मागील वर्षापेक्षा मी यावर्षी पुढे कसा जाईल याविषयी विचार करा व त्याविषयी योग्य नियोजन करा.असे प्रतिपादन खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे यांनी खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात केले.यावेळी व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा विघालयाचे मुख्याध्यापक बाबुराव आडे सर, उपमुख्याध्यापक अरुण पत्की सर,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजनाने करण्यात आली.दि.१५/०६/२०२४ रोजी प्रथम विद्यार्थ्यांचे शालेय प्रवेशद्वारा जवळ रांगोळी सजावट करून व गुलाबपुष्प देऊन विद्यार्थी व

विद्यार्थिनीचे स्वागत शालेय समितीचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक बाबुराव आडे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे यांनी स्वागत केले.नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात प्रातिनिधीक स्वरूपात इ.५वी ते ८वी च्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना पाठ्यपुस्तक वाटप करून करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक बाबुराव आडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले की, ही शाळा,हा परिसर,व हा वर्ग माझा आहे.ही गोष्ट प्रत्येक विद्यार्थ्यानि आपल्या मनावर कोरावी.

एखादी गोष्ट माझी आहे.म्हणून आपण जशी काळजी घेतो त्याचप्रमाणे माझ्या वर्गाची,शालेय परिसराची, शाळेतील प्रत्येक वस्तुंची आपण योग्य पध्दतीने काळजी घ्यावी. असे आवाहन करून या नवीन शैक्षणिक वर्षासाठी त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शैलेश कंगळे सर यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा विघालयाचे मुख्याध्यापक बाबुराव आडे,उपमुख्याध्यापक अरुण पत्की,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,ग्रंथपाल राजेंद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

विनायक प्राथमिक शाळेचा प्रवेशोत्सव

बीड । प्रतिनिधी

दि १५ जुन २०२४ रोजी विनायक प्राथमिक शाळेत नवीन इयत्ता १ ली प्रवेशीत विद्यार्थ्यांचा सत्कार गुलाबाचे पुष्पगुच्छ देऊन करून उत्साहपूर्ण वातावरणात शालेय कामकाजाची सुरुवात करण्यात आली.शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. किर्तीताई पांगारकर यांनी नवीन प्रवेशीत मुला मुलींचे त्यांच्या आईवडिलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून त्यांचा उत्साह वाढवला .खुप मोठ्या उत्साहात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी प्रवेशोत्सव आयोजीत करून शालेय वातावरण उत्साहपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रसंगी विविध पालकांनी शाळेला भेट देऊन शालेय व्यवस्थापनेचा आढावा घेऊन परिस्थिती जाणून घेऊन शाळेच्या पहिल्या दिवशी उपस्थिती दर्शवली. शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या

नियोजनानुसार सर्व विद्यार्थ्यांना नवीन क्रमीत पुस्तकांचे वाटप करण्यात आले.शाळेतील सर्व मुला मुलींनी आपल्या आरोग्याची काळजी घेऊन शाळेत नियमित उपस्थित राहावे,शालेय अभ्यासक्रम नियमित करण्यात यावा दररोजचा अभ्यास,गृहपाठ नियमितपणे करावा असे अहवान करण्यात आले.यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षक ,शिक्षिका ,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित राहिले.

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये जागतिक पितृदीन साजरा

परळी । प्रतिनिधी

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी जागतिक पितृदीन उत्साहात साजरा केला. कार्यक्रमासाठी पालकांचा व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात प्रशालेतील इयत्ता पहिली ते पाचवीचे विद्यार्थ्यांनी सहभागी होत व विविध कलाकृतींचे सादरीकरण करत आपल्या कलागुणांची चुणूक दाखवत उपस्थित पालक व शिक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरूवात प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत पाटील व उपस्थित पालकांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मनमोहक असे स्वागतगीत सादर केले. त्याचबरोबर उपस्थित पालकांचे स्वागत त्यांच्याच पाल्यांनी बनवलेल्या आकर्षक भेटकार्ड व पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थी व प्रशालेचे प्राचार्य यांनी केले.

सदर प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत नृत्य, कविता वाचन व गीत गायन सादर केले.त्याचबरोबर प्रशालेच्या वतीने पालकांसाठी विविध मनोरंजनात्मक व उत्साहवर्धक खेळांचे आयोजन करण्यात

आले होते ज्याला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर प्रसंगी प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत पाटील यांनी विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन करत संवाद साधला, सहभागी विद्यार्थ्यांचे व पालकांचे कौतुक विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा ऊषा किरण गित्ते तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक किरण गित्ते त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीकांत पाटील यांनी केले.

यशाला कुठलाही शॉर्टकट नसतो प्रमाणिकपणे प्रयत्न हाच यशाचा कानमंत्र - कदम महाराज

बीड । प्रतिनिधी

उंच ध्येय गाठण्यासाठी मोठी स्वप्न पहा आणि जितोड मेहनत करा. यश मिळवण्यासाठी उत्तम मार्गदर्शक आणि कठीण परिश्रम मेहनत आवश्यक असते. असे प्रतिपादन नाना महाराज कदम यांनी केले. बीड तालुक्यातील आंबिलवडगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती माझी न्यायमूर्ती बिपिन मंत्री ,ज्येष्ठ विधीज्ञ मनोहर तांदळे, कृषी विद्यापीठ परभणीचे शास्त्रज्ञ डॉ संदीप पायाळ, सुरेश महाराज जाधव, सरपंचपती चंद्रसेन कीलमिसे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रसाळ सर, छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र खेडकर यांच्या सह सर्व शिक्षक वृंद यांची उपस्थिती होती.

बीड तालुक्यातील आंबिलवडगाव येथे कै. अण्णासाहेब तांदळे शिक्षक प्रसारक मंडळाच्या

छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.. शाळेचा निकाल १०० टक्के लागला. शाळेचा व गावकऱ्यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये वैष्णवी तांदळे -९१% प्रथम क्रमांक, सानिया भालेराव- ९० %द्वितीय , प्रगती गंगावणे-८९% तृतीय क्रमांक मिळवले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुरेश महाराज जाधव म्हणाले की यश मिळवत असताना कुठलाही यशाला शॉर्टकट नसतो. प्रमाणिकपणे प्रयत्न हाच यशाचा कानमंत्र आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नाना महाराज म्हणाले की उंच ध्येय गाठण्यासाठी मोठी स्वप्न पहा आणि जी तोड मेहनत करा ज्यामधून यश मिळेल. जोपर्यंत अभ्यासातून स्वतःची प्रतिष्ठा ओळख निर्माण होत नाही तोपर्यंत प्रयत्न सोडू नका असे मनोहर तांदळे म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खूप मोठी संघर्षाची क्षमता असते असं संदीप पायाळ म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राजेंद्र खेडकर यांनी केले तर सूत्रसंचालन लक्ष्मण पायाळ यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंदांनी सहकार्य केले.

बिंदूसरा नदीपात्रातील झाडझुडपे, कचऱ्याच्या ढिगामुळे महापुराचा धोका

नदी परिसराची तात्काळ साफसफाई करा- अमृत सारडा

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून बिंदूसरा नदी वाहते मागील अनेक वर्षांपासून नदीपात्रात वाढलेली झाडझुडपे, साठलेल्या कचऱ्याच्या ढिगामुळे मागील अनेक वेळा पेठ बीड भागासह परिसराला पुरपरिस्थीतीला सामोरे जावे लागलेले आहे. बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदूसरा नदीला महापुराचा इतिहास असून यापूर्वी अनेकवेळा नदीकाठावरील नागरिकांना नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान सहन करावे लागले असून नदी पात्राची वेळेत साफसफाई, स्वच्छता केली नाही तर शहराला महापुराचा धोका निर्माण होऊ शकतो.

यासर्व नैसर्गिक परिस्थितीचा बीडच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे व बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी अत्यावश्यक बाब म्हणून नदीपात्रातील साफसफाईचे काम त्वरीत हाती घ्यावे असे आवाहन पेठ बीड शहर विकास कृती समिती बीडच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात पावसाळा सुरू झाला असून यावर्षी पाऊस वेळेवर सुरू झाला आहे. पुढील दोन - तीन महिने मोठ्या पावसाचे आहेत तर नदीपात्रात मोठ्या प्रमाणात लहान मोठ्या झाडाझुडपामुळे पावसाळ्यात पाणी वाहून जाण्यासाठी अडथळे निर्माण होवून ते नदीपात्रातील पाणी नदीकाठावरील लोकवस्तीत शिरते. बिंदूसरा नदीचे पात्र हे उथळ असून डोकेवाडा, पाली परिसरातून पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात बिंदूसरापात्रात येत असते ते पाणी अनेकवेळा नदीकाठावरील लोकवस्तीत येवून परिसरातील घरे, बाजारपेठात शिरुन मोठी आर्थिक, जिवीतहानी होवू शकते म्हणून जिल्हा प्रशासन, मुख्याधिकारी न.प.बीड व पालिका प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे श्री.अमृतकाका सारडा (संस्थापक अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष न.प.बीड), आसाराम (भाऊ) गायकवाड, ॅड. श्रीराम लाखे, मारुती तिपाले, सतीश (आप्पा) पवार, सम्राटसिंह चौव्हाण, लक्ष्मण शेनकुडे, महेबूब खान, द्वारकादास मुंदडा, सुरेश बन्सोडे, राणा चौव्हाण, प्रेम चांदणे, बाळासाहेब गुंजाळ, शेख शद्दोभाई, अजिंक्य चांदणे, राजेंद्र बन्सोडे, सादेकभाई जुमा, जयमल्हार बागल, जयंत राऊत, भरतसिंह चुंगडे, रामसिंग टाक, अमोल पौळ, संजय महाद्वार, मिलिंद महाजन, जितेंद्र लोढा, सुशील खटोड, राम इगडे, सुरेश साळुंके, नितीन इगडे, भारत मस्के, लाला बन्सोडे, सतपाल लाहोट, ईश्वर पवार, रणजित शिनगारे, गौतम कांबळे, महेश राठोड, ईश्वर धन्वे, विलास बामणे, संगीताताई बाबरे, कुमार अरुण, विजय पिव्हाळ, रुस्तुम बेदरे, अविनाश बादाडे, प्रभु चांदणे, शेख अतीक, विलास मोमीन, ललीत अब्बड, शेख खलील, संजय घेणे, नंदकुमार येवले, अविनाश जाधव, श्नीमंत गायकवाड, भारत चांदणे, बप्पा जावळे, गुरुप्रसाद पांडे, भागचंद परदेशी, कल्याण रायते, शाम भागवत, प्रभाकर शिंदे, अनिल मुसळे यांच्यासह सर्व व्यापारी बांधव, पदाधिकारी, सदस्य (पेठ बीड विकास कृती समिती,बीड) तसेच परिसरातील महिला, पुरुष, नागरिकांनी बिंदूसरा नदीपात्रातील झाडेझुडपे, साठलेला कचरा, प्लॅस्टिक कॅरिबॅगासह त्वरित काढून नदीपात्रातील पाणी वाहून जाण्यासाठी त्वरीत कार्यवाही करावी असे आवाहन निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केले आहे.

युसूफवडगांव मध्ये दोन-दोन मटका बुकी ओपन तर पोलीस क्लोज

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील पोलिस स्टेशन पासुन अवघ्या हकेच्या अंतरावर दोन-दोन मटक बुकी चालु असुन याकडे मात्र वडगांव पोलिसांचे जाणिवपूर्वक अर्थपूर्ण दुर्लक्ष असुन मटक्यामुळे कित्येकांचे संसार उध्वस्त होत चालले आहेत.तरी त्यांच्यावर कधी कारवाई करणार असा प्रश्न गावकरी विचारत आहेत.

गेल्या कित्येक दिवसांपासुन युसूफवडगाव येथे अवैध धंद्यांनी धुमाकूळ घातला असुन याकडे मात्र पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे.पोलिस स्टेशन पासुन अवघ्या हाकेच्या अंतरावर दोन दोन मटका बुकी चालत असुन यांच्यावर कारवाई करण्यात येत नाही या मटक्यामुळे कित्येकांचे संसार उध्वस्त होत असुन सर्व सामान्य माणसांना याचे व्यसन लागलं आहे मोलमजुरी करायची आणि या आकड्याच्या खेळामधे आपले पैसे गमवायचे एवढ काम चालु असुन या आकड्याच्या खेळामुळे कित्येकांचे आयुष्य बरबाद झाले आहे तर कित्येक जण याच्या नादी लागुन बरबाद होण्याच्या मार्गांवर आहेत पण पोलीस मात्र कारवाई करायला तयार नाहीत.

कारण यांच्यावर कारवाई करणे म्हणजे सोन्याची अंड देणारी कोंबडी कापुन खान्याचा प्रकार आहे.मटक्यामुळे पोलिसांना महिन्याकाठी भरपुर कमाई होते म्हणुनचे ते कारवाई करत नाहीत.त्यांना मिळणाऱ्या कमाई मुळे मग कित्येकांचे संसार आयुष्य बरबाद झाले तरी बेहतर पण ते बंद करणार नाहीत.असे असले तरी पोलिस स्टेशन प्रभारी यांनी गांभीर्याने दखल घेऊ लवकरात लवकर युसूफवडगांव मटका मुक्त करावे आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करवी व गोरगरिबांचे संसार उध्वस्त होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

परळी महापारेषणचा विक्रम; कमी कालावधीत उच्च वाहिनी दुरुस्ती

महापारेषण आणि कंत्राटदार यांच्या कार्याचे राज्यभर कौतूक

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात बीड आणि लातूर जिल्ह्याला वीज पुरवठा करणाऱ्या उच्च दाब विद्युत वाहिन्या उन्मळून पडल्या.यामुळे दोन जिल्ह्याचा वीज पुरवठा करण्यात महापारेषणला अडचणी निर्माण झाल्या मात्र परळीतील सोमेश्वर विद्युत कंत्राटदार कंपनीचे कर्मचारी आणि महापारेषण अधिकारी-कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत विक्रमी वेळेत दोन किलोमीटर अंतरावर नुकसानग्रस्त विद्युत वहिनी पूर्ववत करत वीज पुरवठा सुरळीत केला.राज्यात विक्रमी वेळेत काम पूर्ण करण्याचे कार्य परळी महापारेषण आणि परळीतील कंत्राटदार यांनी केल्याने राज्यभर या कार्याची स्तुती होत आहे.

मान्सून आगमनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या गिरवली विभागाअंतर्गत येणारे अतिदुर्गम डोंगराळ भागात असलेल्या नंदागौळ, अंबलवाडी शिवारात येणारे अतिउच्चदाब वाहिनीचे सहा मनोरे कोसळले. या दुर्घटनेमुळे २२० के.व्ही. गिरवली परळी सर्किट २ आणि २२० केव्ही परळी

पीजीसीआयएल पॉवरग्रिड सर्किट २ दोन महत्त्वाच्या विद्युत वाहिन्या बंद पडल्यामुळे बीड व लातूर या जिल्ह्यांना होणाऱ्या विद्युत पुरवठ्या खंडित झाला.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महापारेषण प्रशासनाकडून तातडीने उपाय योजनेसाठी पाऊले उचलण्यात आली. महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण , छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता नासिर कादरी तसेच परळी मंडळाचे अधीक्षक अभियंता मिलिंद बनसोडे यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पुनर्रउभारणीच्या कामाची नियोजनबद्ध आखणी केली. या कामासाठी लातूर, परळी व गिरवली येथील अभियंते व कर्मचाऱ्यांची संघबांधणी करून मनोरे उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. भौगोलिक दृष्ट्या अत्यंत दुर्गम असलेल्या डोंगरांवर मनोरे पुनर्रउभारणीचे काम करणे अतिशय जिकरीचे व अवघड होते. प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे मनोरा उभारणीसाठी लागणारे साहित्य व यंत्रसामग्रीची वाहतूक करणे अत्यंत कठीण होते. या सर्व अडचणींवर मात करीत एकसंघपणे महापारेषणचे अभियंते व कर्मचारी मुख्य अभियंता नासिर कादरी व अधीक्षक अभियंता मिलिंद बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली अहोरात्र काम करण्यात आले.

सोमेश्वर एजन्सीचे सर्वत्र कौतुक

दोन जिल्ह्याला विद्युत पुरवठा करणाऱ्या नुकसानग्रस्त उच्च दाब वहिनीला पूर्ववत करण्यासाठी मे.सोमेश्वर एजन्सीचे संचालक चंद्रकांत गित्ते आणि त्यांच्या चमूने दुर्गम आणि डोंगराळ भागात अहोरात्र मेहनत करत अनेक किलोमीटरवर नुकसानग्रस्त विद्युत वहिनी विक्रमी वेळेत पूर्ववत करण्यात यशस्वी झाल्याने राज्यभर सोमेश्वर एजन्सी वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अत्यंत कडक उन्हात कुठल्याही प्रकारची सावली अथवा सुविधा नसलेल्या निर्जळ ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक तांत्रिक अडचणीवर मात करीत महापारेषाणच्या परळी, लातूर, बीड चे अधिकारी व कर्मचारी व परळीतील युवा कंत्राटदार सोमेश्वर विद्यूतचे संचालक चंद्रकांत गित्ते यांनी आपल्या चमुसह एकत्रितपणे अहोरात्र मेहनत घेऊन कोसळलेल्या सहा विद्युत मनोऱ्यांचे पायाभरणी, मनोरा उभारणी आणि २ किलोमीटर तार ओढणीचे काम विक्रमी वेळात पूर्ण केले ◀◀ पान ३ वर

योग्य वेळी योग्य निर्णय घेवू - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

भावनेच्या आहरी जावू नका, पुढच्या प्रवासाला साथ द्या

बीड । प्रतिनिधी

सध्याच्या सुरू असलेल्या एकंदरीत राजकीय परिस्थितीचा आढावा घेवून आणि तुमच्या सर्वांच्या भावना लक्षात घेवून योग्य वेळी योग्य निर्णय घेवू असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

आशिर्वाद मंगल कार्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ नेते रविंद्र क्षीरसागर, सौ.प्रियाताई क्षीरसागर (महिंद्रे), ह.भ.प.नाना महाराज ढेकणमोहाकर, जगदिश काळे,

माधवराव मोराळे, विलास बडगे, गंगाधर घुमरे, तानाजी कदम, दिनकर कदम, बाबुसेठ लोढा, अशोकराव होके पाटील, सहाल चाऊस, अरूण डाके, वचिष्ठ नवले, रोहित क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, शरद ढाकणे, गणपत डोईफोडे, अजिंक्य चांदणे, सुधाकर मिसाळ, मुखीद लाला, ॲड.सय्यद खाजा, नरसिंह नाईकवाडे, सनी वाघमारे, विलास विधाते, राणा चौव्हाण, दिलीप आहेर, उषाताई सरवदे, सुभाष क्षीरसागर, सुभाष बनसोडे, सखाराम मस्के, सुधाकर जाधव, अरूण बोंगाणे, सुलेमान पठाण, जमील भाई, राजेंद्र काळे, शेषेराव फावडे, धनंजय जगताप, शिवाजीराव जाधव, सचिन घोडके, भगवान गवते, अर्जून नरवडे, सिध्देश्वर आर्सुळ, विष्णु जाधव यांची उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्व.काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर कदम यांनी केले तर तानाजी कदम, उषाताई सरवदे, सुधाकर मिसाळ, बाबूसेठ लोढा, अजिंक्य चांदणे, गंगाधर घुमरे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलतांना माजी मंत्री जयदत्त ◀◀ पान ३ वर

गुलमोहर बहरला, रंगीबेरंगी फुलांची मनाला प्रसन्नता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उन्हाळा हा उष्णता निर्माण करणारा महिना आणि कोरड्या हवामानाचा काळ असतो अशा वातावरणात अनेक झाडांची पानझड होत असते मात्र उन्हाळा आणि गुलमोहर रंगबिरंगी फुलांनी आपल्या सौंदर्यात दिसत आहेत असे गुलमोहर अंबाजोगाई शहरातील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या परिसरात फुलल्यामुळे मन प्रसन्न होत आहे या ठिकाणी संस्था परिसरात इतर झाडांच्या लागवडीप्रमाणे आणि गुलमोहराची झाडे मोठ्या प्रमाणात आहेत आणि ती

उन्हाळ्यात संपूर्णपणे बहरले आहेत लाल नारंगी आणि पिवळ्या रंगाची मोठी मोठी फुले झाडावर सर्व स्थित ◀◀ पान ३ वर

फादर्स डे निमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

बीड : फादर्स डे निमित्त परिसरातील गुणवत विद्यार्थी तसेच पालक यांचा, नगरसेवक रंजीत बनसोडे यांनी कार्यक्रम आयोजित केला होता, या प्रसंगी प्रमुख पाहुने नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, शिवाजी सुरवसे,डोके निवृती, आठवले सर वनवे सर,विकास परदेशी सर, डोंगरे सर, डाबे सर,करपे सर होते तसेच समवेत खटाने काका, पंडित काका, व्हावळ काका,सिरसट काका, शहाने सर, नाइकनवरे सर, नाइकवाडे सर,पवार सर, आगलावे काका, घोडके काका,जाधव सर, बामने सर आदी मान्यवर मोठ्या सखेने उपस्थित होते.तसेच सत्कार मूर्ति, मनस्वी संजय मस्के, सुयश सुभाष डाम्बे, शितल चंद्रकांत नागरगोजे, कु.शहाणे ताई, अवन्ति विकास परदेशी, क्रांति संतोष डोंगरे, दिपक अशोकराव कांबळे,रोशन राजेभाऊ व्हावळकर, आदी सत्कार मूर्ति उपस्थित होते. यासमवेत भागीतील नागरिक उपस्थित होते.

पराभव जिव्हारी लागल्याने आणखी एका तरूणाची आत्महत्या

पंकजाताई मुंडे व्यथित, वारणीत अंत्यविधीला हजेरी; गणेश बडेच्या कुटुंबियांचे केले सांत्वन

शिरूर कासार । प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने एका तरूणाने गळफास घेऊन स्वतःला संपवले. तालुक्यातील वारणी येथे दुपारी ही घटना घडली. हरिभाऊ उर्फ गणेश बडे असे या तरुणाचे नाव आहे. पंकजाताई मुंडे यांनी सायंकाळी वारणी येथे त्याच्या अंत्यविधीला उपस्थित राहून बडे परिवाराचे सांत्वन केले.

लोकसभेत झालेला पराभव जिव्हारी लागल्याने

तालुक्यातील वारणी येथील गणेश उर्फ हरिभाऊ बडे (वय ३०) या तरूणाने दुपारी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने गावात शोककळा पसरली. पंकजाताई मुंडे आज बीड दौर्यावर होत्या, त्यांना हे समजताच त्या तातडीने वारणीत पोचल्या. सायंकाळी त्यांनी अंत्यविधीला उपस्थित राहून गणेशच्या परिवाराचे सांत्वन केले.

कृपा करून अशी पावलं उचलू नका

कोणत्याही नेत्यावर अशी वेळ येवू नये ती माझ्यावर आली. अशा घटना समजण्या पलिकडे आहेत. मुंडे साहेबांच्या चितेसमोर मी शपथ घेतली होती मी रडणार नाही लढणार पण या ज्या घटना घडत आहेत, त्यात मी स्वतःला सावरू शकले नाही. मी कशाच्या जीवावर लढू. माझेसाठी माझा कार्यकर्ता महत्वाचा आहे. गणेशच्या आत्म्याला शांती मिळो, त्याच्या परिवाराला मी आधार देईल. वाऱ्यावर सोडणार नाही. माझी विनंती आहे, कृपया करून अशी पावलं उचलू नका. आपल्या मुला बाळांना, परिवाराला सोडून जावून नका अशा शब्दांत पंकजाताईंनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पंकजाताई मुंडे यांनी गहिनीनाथ गडावर जावून केली विठ्ठल महाराजांच्या तब्येतीची विचारपूस

बीड । प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. आपण लवकर बरे व्हावेत यासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

महंत विठ्ठल महाराज यांच्या गाडीचा नुकताच अपघात झाला होता, त्यात ते जखमी झाले होते. ही बातमी समजल्यावर पंकजाताई मुंडे यांनी त्यांना रूग्णालयात फोन करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती तसेच डॉक्टरांनाही संपर्क केला होता. आज बीड दौर्यावर आल्या असता पंकजाताई यांनी गहिनीनाथ गडावर जाऊन विठ्ठल महाराजांची भेट घेतली व तब्येतीची विचारपूस केली. आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे हे देखील यावेळी उपस्थित होते.

शिवसंग्रामची बीड शहर कार्यकारिणी जाहीर

शहर शिवसंग्राम कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे -डॉ.ज्योतीताई मेटे

बीड । प्रतिनिधी

आगामी काळात येऊ घातलेल्या बीड नगरपालिका निवडणूक,पक्ष बांधणी व विस्ताराच्या अनुषंगाने शिवसंग्राम भवन, नगर नाका,बीड येथे काल रविवार,दिनांक १६ जून रोजी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा आदरणीय डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली व्यापक बैठक संपन्न झाली. शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हा सरचिटणीस अनिल भाऊ घुमरे, बीड विधानसभा अध्यक्ष प्रा.सुभाष जाधव सर यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी शहर कार्यकारिणी जाहीर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्धीप्रमुख मनोज जाधव यांनी केले.

शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा आदरणीय डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत बीड शहरातील विविध प्रभागातील प्रभाग प्रमुखांच्या सोबतच शहर कार्यकारीणी सदस्यांच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत यात प्रामुख्याने बीड शहर अध्यक्ष, शहर उपाध्यक्ष, शहर सचिव, शहर सहसचिव कोषाध्यक्ष संघटक व विभाग प्रमुख यांच्या निवडी करण्यात आलेल्या आहेत.यामध्ये शहराध्यक्षपदी सुहास पाटील, शहर उपाध्यक्षपदी शेषेराव तांबे, सातीराम ढोले व शेख नदीम शेख गणी, शहर सचिवपदी गोपीनाथ देशपांडे, शहर सहसचिवपदी हनुमंत पवार, शहर कोषाध्यक्ष हरीश शिंदे, शहर संघटक सुशील कांबळे, तर विभाग प्रमुख म्हणून हरिश्चंद्र ठोसर,कुंदन गायकवाड,नितीन आगवान यांच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते सन्मानित ◀◀ पान ३ वर

अंबाजोगाईत महेश नवमी उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माहेश्वरी समाजाचा उत्पत्तीदिन 'महेश नवमी' दि. १५ जुन रोजी अंबाजोगाई तालुका माहेश्वरी समाजाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते तसेच अंबाजोगाई शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेने शहरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.

माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन 'महेश नवमी' दरवर्षी सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. यावर्षीही अंबाजोगाई तालुका माहेश्वरी समाजाच्या वतीने दि. १५ जुन रोजी महेश नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. समाजाच्या वतीने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी येथील केदारेश्वर मंदिरात महारुद्राभिषेक करण्यात आला. यानंतर या मंदिर परिसरातच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजाच्या विविध संघटनांनी उत्साहाने सहभागी होऊन वृक्षारोपण केले. यानंतर येथील राजस्थानी मंगल कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबीरात ४५ युवकांनी रक्तदान केले. यानंतर दुपारी महेश पूजन करण्यात आले. यावेळी महिलांनी 'एकत्र परिवार, गांव के संस्कार, जीवन हो साकार' ही नाटीका सादर केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नंदकिशोर भन्साळी, विष्णुदासजी काकानी, विजयकुमारजी सोनी, गिताबाई जाजू, सुलोचना बियाणी उपस्थित होते. यानंतर संध्याकाळी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ढोल पथक, बाल वारकरी मंडळ, सुशोभित रथात बसलेले उमा-महेश यांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले होते. ही शोभायात्रा राजस्थानी मंगल कार्यालयापासून सुरुवात होऊन शिवाजी चौक, मंगळवार पेठ, बसस्थानक स्थानक मार्गाने संपन्न झाली. या शोभायात्रेत समाजातील शेकडो महिला, पुरुष, युवकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या सांगता स्नेह भोजनाने झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी सभा, माहेश्वरी महिला संघटन, माहेश्वरी किशोरी संघटन व माहेश्वरी युवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

गोव्यातली स्वस्त दारू नेणारा टेम्पो बारामतीत जप्त; तर पुण्यात ३०० पोती गुटखा हस्तगत

पुणे । प्रतिनिधी

गोवा हे पर्यटनासाठी जेवढं प्रसिद्ध ठिकाण आहे, तेवढंच तेथे कमी पैशात किंवा स्वस्तात मिळणाऱ्या दारुमुळेही गोवा पर्यटकांची पंसत आहे. गोवा सरकारने दारुवरील टॅक्स कमी केल्यामुळे महाराष्ट्र आणि देशातील इतर ठिकाणांपेक्षा कमी किंमतीत गोव्यात दारू मिळते. मात्र, गोव्यातून दारु दुसरीकडे नेता येत नाही.तरीही पर्यटक छुप्या पद्धतीने गोव्यातून दारुची अवैध वाहतूक होत असते. गोव्याकडून अवैधरित्या नगर जिल्ह्यात दारू नेत असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दौंड विभागाच्या पथकाने कारवाई केली आहे. दुसरीकडे पुणे शहरात गुटख्याची २५० ते ३०० पोती जप्त करण्यात आली असून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे.

बारामतीच्या मोरगाव सुपे रस्त्यावर मूर्टी गावच्या हद्दीत उत्पादन शुल्क विभागाने ही दारू पकडली. बारामती तालुक्यातील मूर्टी गावच्या हद्दीत हॉटेल सानिकानजीक एक संशयीत बोलेरो पिक अप वाहन आणि हुंडाई कंपनीची क्रेटा गाडी उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी थांबवली. तसेच, वाहन चालकाकडे वाहनांमध्ये काय आहे, अशी विचारणा करत चौकशी केली असता दोन्ही वाहन चालकांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने अधिक विचारपूस करण्यात आली. ही दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला घेऊन तपासणी केली असता आंब्याच्या रिकाम्या लाकडी पेट्यांच्या आड गोवा राज्यात तयार केलेली व विक्री परवानगी असलेली विदेशी दारू सापडली. त्यामध्ये तब्बल १२ लाख ६१ हजार रुपयांची दारू, दोन चारचाकी वाहने आणि दोन मोबाईल हँडसेट असा ३० लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या पथकाने जप्त केला.

अहमदनगर जिल्ह्यात ही दारू विक्री करण्याच्या उद्देशाने परराज्यातून चोरून आणल्याचे आरोपींच्या तपासातून स्पष्ट झाल्याने त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ चा ८०, ८१, ८३, ९० व १०८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ४ जणांना अटक करण्यात आली आहे. अधिक तपास पोलिसांकडून सुरू आहे. अहमदनगर जिल्ह्यात नेमकी कुठे ही दारू नेण्यात येत होती, या अगोदरही अशा पद्धतीने दारुची अवैध विक्री झाली आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत. पुण्यातील नऱ्हे परिसरातून १ कोटी ३९ लाख रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. तब्बल २५० ते ३०० गुटख्याची पोती जप्त करण्यात आली आहेत. एकाच ठिकाणी असलेल्या गुटखा कारखाना आणि गोडाऊन वर पोलिसांनी छापा टाकून ही कारवाई केली. याप्रकरणी ४ जणांना गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली असून पुण्यातून नगर, नाशिक, सातारा अशा अनेक ठिकाणी या गुटख्याची विक्री होत होती. पोलिसांनी केलेल्या कारवाईत कारखान्यांवरून गुटखा तयार करण्याचे सामग्री सुद्धा जप्त केली आहे. या कारवाईतून गुटखा विक्री आणि उत्पादन करण्याचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. याप्रकरणी पुष्पेंद्र सिंग, सुनिल सिंग, मुकेश गेहलोत आणि चंदन सिंग अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर, आरोपींचा साथीदार निलेश ललवानी याच्यावरही गुन्हा दाखल असून पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे.

'व्हायोलिन ग्राफी' ला चांगला प्रतिसाद !

भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

पुणे । प्रतिनिधी

भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत आयोजित 'व्हायोलिन ग्राफी' या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. निनाद निकेतन म्युझिक अकॅडमी प्रस्तुत या कार्यक्रमात गीत,संगीताचा सुरेल आविष्कार सादर करण्यात आला. निर्मिती, संगीत संयोजन अंजली सिंगडे-राव यांचे होते. ओमकार पाटणकर (कीबोर्ड), विकास क्षीरसागर,नितीन कुलकर्णी (तबला), अभय इंगळे(रिदम),प्रसाद साहोत्रे(गिटार) यांनी साथसंगत केली. आर जे तेजू,प्रफुल्ल कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

हा कार्यक्रम शनीवार, दि. १५ जून २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.हा कार्यक्रम विनामूल्य होता.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१२ वा कार्यक्रम होता.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी कलाकारांचा सत्कार केला. हंस ध्वनी राग, यमन राग अशी प्रस्तुती प्रारंभी करण्यात आली. ओम जय जगदीश हरे, आओगे तुम साजना ,तुम मिले,चुरा लिया हैं तुमने अशी अनेक बहारदार गीते व्हायोलिन वादनातून सादर करण्यात आली. काही गीतांची झलक दाखविण्यात आली. जागतिक व्हायोलिन दिनाच्या दोन दिवस आधी केलेल्या या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

पुण्यात 'फादर्स डे'च्या दिवशी बाप झाला हैवान, चार वर्षाच्या चिमुरडीला चाकूचे चटके देत शारीरिक अत्याचार

पुणे : काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे. फादर्स डे दिवशी पित्याने चिमुकलीला चाकूने चटके दिल्याची घटना घडली आहे. अवघ्या चार वर्षीय बालिकेवर बापाकडून अत्याचार (झींपश डीळाश छशुी) झाल्याच्या घटनेनं अवघा महाराष्ट्र हादरला आहे. पुण्यातील भारती विद्यापीठ पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सुनील चौहान असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ५ ते १४ जून दरम्यान घडली आहे. चार वर्षाची चिमुकली शाळेत सतत रडत असे. शिक्षिकेला मुलीच्या हातावर चटके दिल्याचे वण दिसले. रोज शाळेत चिमुरडी रडत असल्याने शिक्षिकेने तिला प्रेमाने जवळ घेत कारण विचारले. त्यानंतर चिमुकलीने घडलेला सगळा प्रकार सांगितला त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी या चिमुरडीचा सावत्र होता. आई आणि सावत्र बाप हे दोघेही मजुरीचे काम करत होते.त्यामुळे सुरुवातीला आईने पोलिसात तक्रार दिली नव्हती. मात्र सावत्र बाप चिमुकलीचा वारंवार पीडितेचा छळ करत होता. त्यामुळे आईनेच पोलिसांत फिर्याद दिली आहे. आरोपी लहान मुलीशी अश्लील वर्तन करत होता तसेच अनेक वेळा त्याने चाकू गरम करून तिला चटके सुद्धा दिलेत असं फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलिसांकडून सुरू आहे. घडलेल्या प्रकारामुळे पीडित मुलगी घाबरुन गेली.या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून आजच्या दिवशी ही क्रूर घटना घडल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

यम्मो कंपनीच्या आईस्क्रीमध्ये बोट सापडलं; इंदापूरच्या 'फॉर्च्यून' डेअरीच्या संचालकांचा खळबळजनक दावा

पुणे । प्रतिनिधी

आईस्क्रीममध्ये मानवी शरिराचे बोट सापडल्याने खळबळ उडाली असून अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाईही सुरू केली आहे. मुंबईच्या (चींलरळ) मालाडमधील एका महिलेने ऑनलाईन पद्धतीने यम्मो कंपनीचं आईस्क्रीम मागवले होते. या महिलेने त्या आईस्क्रीमचा कोन खायला सुरुवात करताच तिला त्यामध्ये मानवी बोटाचा तुकडा दिसला. आईस्क्रीममध्ये (खलश लीशरा) मानवी अवयवाचा तुकडा पाहातच महिला ओरडू लागली आणि बेशुद्ध पडली. काही क्षण तिच्या कुटुंबातील लोकांनाही काहीच समजलं नाही. पण, त्यांना सर्व प्रकार लक्षात येताच त्यांनी तात्काळ मलाड पोलीस ठाणे गाठलं. मालाड पोलिसांनी (झेश्रळलश) याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर यम्मो कंपनीवर कारवाई सुरू झाली असून इंदापूर (खपवर्ीी) येथील फॉर्च्यून डेअरीलाही उत्पादन बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यासंदर्भात आता डेअरीचे संचालक सजिन जाधव यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

यम्मो कंपनीचे आईस्क्रीम विविध ठिकाणावरून बनवून घेतले जातात, त्यापैकी ते इंदापुरातील फॉर्च्यून डेअरीमार्फत देखील बनवले जातात. मुंबईतील मालाडमध्ये एका महिलेला आईस्क्रीममध्ये मानवी बोट सापडल्याच्या घटनेनेनंतर इंदापुरातील फॉर्च्यूनर डेअरीचा परवाना

स्थगित करण्यात आला आहे. त्यानंतर, फॉर्च्यून डेअरीचे संचालक सचिन जाधव यांनी पत्रकार परिषदेत घेत यम्मोने आईस्क्रीम बनवणाऱ्या सर्व कंपन्यांचा पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात स्थगित केल्याची माहिती दिली.

यम्मो कंपनीच्या ब्रँडला बाजारात बदमान करण्याची शक्यता असल्यामुळे असा प्रकार झाला असावा असा खळबळजनक दावाही त्यांनी प्रतिक्रियेच्या माध्यमातून केला आहे. कंपनीबाबत झालेल्या तक्रारीसंदर्भात पोलीस तपास सुरु आहे. यंत्रणेला तपासात आम्ही सहकार्य करत आहोत. एफएसआयकडून फॉर्च्यून डेअरी ही दूध, भुकटी, बटर उत्पादन करण्यासाठी परवानगी घेऊन ते पुन्हा चालू करण्यासाठी आमचा प्रयत्न असणार असल्याचंही फॉर्च्यून डेअरीचे सचिन जाधव यांनी पत्रकार परिषदेत म्हटलं आहे. सदर घटना मालाडमध्ये घडली असून तपास यंत्रणांचे काम सुरु आहे. याबद्दल अधिक कोणतीही माहिती आमच्यापर्यंत आलेली नाही. कंपनी कुठेही सील केलेली नाही कंपनीचा परवाना हा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केलेला आहे, असे जाधव यांनी सांगितले. दरम्यान, पुणे, गाझियाबाद आणि पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथून ही कंपनी आईस्क्रीमचे उत्पादन करते.

मुंबईतील मालाड परिसरात एका महिलेला आईस्क्रीमच्या कोनमध्ये मानवी बोटाचा तुकडा सापडला होता. या महिलेने ऑनलाइन डिलिव्हरी पद्वारे यम्मो कंपनीचा आईस्क्रीम कोन मागवला होता. त्या आईस्क्रीम कोनमध्ये मानवी बोटाचा तुकडा आढळला. त्यामुळे घाबरलेल्या महिलेने मालाड पोलीस ठाणे गाठून पोलीस तक्रार दिली. मालाड पोलिसांनी यम्मो आईस्क्रीम कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करुन हे आईस्क्रीम तपासासाठी पाठवलं आहे. मालाड पोलिसांनी आईस्क्रीममध्ये सापडलेला मानवी अवयव फॉरेन्सिककडे विभागागाकडे पाठवला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. आईस्क्रीम ज्या ठिकाणी बनवले आणि पॅक केले त्याचाही शोध घेण्यात येणार आहे.

बकरीईद निमित्ताने सोमवारी बेल्हे बैल बाजार राहणार बंद

पुणे । प्रतिनिधी

सोमवार दि.१७ रोजी बकरी ईद असल्याने,बेल्हे या ठिकाणी भरत असलेला जनावरांचा बाजार बंद राहणार असल्याचे पोलिस निरीक्षक सतीश होडगर यांनी सांगितले.

माहिती देताना पोलिस निरीक्षक होडगर म्हणाले की,सोमवारी बकरी ईद सण साजरा केला जाणार आहे.त्यात महाराष्ट्रात प्राणी संरक्षण कायदयानुसार दुध देणाऱ्या गायी, म्हैस,बैल, रेडा,पारडी,वळु अशा गोवंश जनावरांची कत्तल व त्यांचे मांस वाहतुक करण्यास बंदी आहे.बकरी ईद सणाचे कत्तलसाठी जनावरांची मोठया प्रमाणात सोलापूर रोड,अहमदनगर रोड,सासवड रोड व नाशिक रोडने वाहतूक होऊन सदरच्या वाहतुकीस काही संघटनांकडून विरोध होऊन अटकाव होण्याची आणि त्याप्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यासाठी बकरी ईदचे दिवशी गोवंश जनावरांची कत्तल रोखण्यासाठी जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील जनावरांचा बाजार(दि.१७)रोजी बंद ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी आदेश दिला आहे.सोमवारी बेल्हे येथील केवळ जनावरांचा बाजार बंद राहणार आहे.या आदेशाची पायमल्ली करून कायदा आणि सुव्यवस्था अडचणीत आणणाऱ्यावर कारवाई केली जाणार असा इशारा पोलिस निरीक्षक होडगर यांनी दिला.

इंदापुरात आगार व्यवस्थापकाच्या मनमानी कारभाराविरोधात बसचालकाचे सहाव्या दिवशीही उपोषण सुरूच!

इंदापूर । प्रतिनिधी

इंदापूर बस आगारातील नादुरुस्त गाड्या चालकांना चालवायला देऊन चालक तसेच प्रवासी यांचा जीव धोक्यात घालणाऱ्या आगार व्यवस्थापकाविरोधात बस चालकाने आमरण उपोषण सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांना मानसिक व शारीरिक त्रास देणाऱ्या अशा आगार व्यवस्थापकाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान उपोषणाचा सहावा दिवस उजाडला असतानाही प्रशासनाकडून कोणतेही ठोस कारवाई न झाल्याने उपोषण सुरूच आहे. यामुळे एसटी महामंडळाचा उदासीन कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर येत आहे.

इंदापूर बस आगारातील बस चालक हर्षल रघुनाथ ठोसरे व सुराज्य निर्माण सेनेचे राज्य अध्यक्ष अमर एकाड हे मंगळवार(ता.११ जून)पासून इंदापूर आगाराच्या प्रवेशद्वारासमोर अमरण उपोषण करीत आहेत. दरम्यान त्यांच्या उपोषणाच्या चौथ्या दिवशी उपोषणकर्ते हर्षल ठोसरे व अमर एकाड यांची तब्येत खालावल्याने त्यांना पोलीस प्रशासन व आरोग्य अधिकाऱ्यांनी इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र त्यांनी पुन्हा उपोषणाला सुरुच ठवले

आहे.रविवार त्यांच्या उपोषणाचा त्यांचा सहावा दिवस आहे. उपोषणकर्ते यांनी दिलेल्या माहितीनुसार इंदापूर बस आगारात बस गाड्यांची कामे न करता बिगाड झालेल्या गाड्या चालकांना चालवायला आगार व्यवस्थापक इंदापूर हनुमंत गोसावी भाग पाडत आहेत.त्यामुळे बसचे अपघात होतात, अनेक ठिकाणी तर बस बंद पडत आहेत. अशा वेळी होणारी आर्थिक नुकसान भरपाई चालकाकडून वसूल करत असल्याचा प्रकार देखील माहिती अधिकार मधून उघड झाले आहे. या कारभाराची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी आहे. मात्र प्रशासन चौकशी समिती नेमण्यात तयार नाही यामुळे इंदापूर आगाराच्या कारभारात मोठे गौडबंगाल सुरू आहे की काय अशी शंका उपस्थित होत आहे. जर तसे नसेल तर प्रशासनाने तात्काळ समिती नेमून अधिकाऱ्यांची चौकशी करणे गरजेचे आहे.

तसेच यासंदर्भात पुणे व मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी यांनीही वारंवार तक्रार करूनही कोणतीच कारवाई केली नसून ही अंत्यत गंभीर बाब आहे. तरी एसटी महामंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याप्रकरणी लक्ष घालून प्रकरणाची सत्यता पडताळणे आवश्यक आहे अन्यथा उपोषणकर्त्याची तब्येत अजून खालवली जात असल्याने अघटित घटना घडू शकते.

उपोषणकर्त्याने आमच्याशी येऊन चर्चा करावी..

दरम्यान याबाबत एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रण प्रमोद नेहुल यांना संपर्क साधला असता कसली चौकशी समिती नेमली जाणार नाही उपोषण करताना आपल्या तब्येतीची काळजी घ्यावी आणि आमच्याशी येऊन चर्चा करावी अशी भूमिका मांडली. तर आगार व्यवस्थापक हनुमंत गोसावी म्हणाले उपोषणकर्त्याने तब्येतीची काळजी घेऊन वरिष्ठांशी चर्चा करावी.अशीच भूमिका मांडली. दरम्यान या प्रकरणात वरिष्ठ अधिकारी चौकशी समिती नेमण्यात का नकार देत आहेत असा प्रश्न उपस्थित होत आहे

'सगे-सोयरे'ची अधिसूचना रद्द करण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग अधिनियमात 'सगे-सोयरे' हा शब्द समाविष्ट करण्यासाठी एक अधिसूचना निघाली. त्यावर लाखोंच्या संख्येने लेखी हरकती प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे ही अधिसूचना रद्द करावी, अशी मागणी ओबीसी संघटनांनी केली आहे.

या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ काही ओबीसी संघटनांनी आंदोलन सुरू केले आहे. अधिसूचना रद्द करण्याच्या मागणीची सरकार दखल घेत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे उपोषणकर्ते ड. मंगेश ससाणे यांनी सांगितले. या उपोषणाला ओबीसी फाउंडेशन, ओबीसी रणसंग्राम, महात्मा फुले समता परिषद, माळी महासंघ, ज्योती मित्रा मंडळ, बारा बलुतेदार संघटना, ओबीसी जण मोर्चा आणि अखिल भारतीय भटके विमुक्त परिषद आदी संघटनांनी पाठिंबा दिला आहे.

सोयरीकीतून म्हणजेच विवाहातून जात येते, असा कुठलाही उल्लेख धर्मशास्त्रात किंवा कोणत्याही धर्माच्या कायद्यात नाही. 'सगे-सोयरे' या शब्दाची कायदेशीर व्याख्या कुठेही नाही. विवाह हे आंतरजातीय व आंतरधर्मीय होत असल्याने 'सगे-सोयरे' हे स्वजातीयबरोबर इतर जातीय, इतर धर्मीय सुद्धा असू शकतात, असा ढोबळ शब्द जर कायद्यामध्ये, नियमावलीमध्ये राहिला तर याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला जाणार आहे. त्यामुळे सामाजिक अस्वस्थता निर्माण होऊ शकते व त्यामुळे इतर मागासवर्गीय, भटके विमुक्त, बलुतेदार, विशेष मागास प्रवर्ग आणि अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती या प्रवर्गाच्या संविधानिक, न्यायिक हक्काने गदा येऊ शकते, असे ॲड. ससाणे यांनी सांगितले.

मुलाला जामीन मंजूर करताना झाल्या पुष्कळ चुका, समितीचा अहवाल सादर

पुणे : कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करताना बाल न्याय मंडळाच्या (जेजेबी) सदस्यांकडून पुष्कळ चुका राहिल्या आहेत, असा अहवाल या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने सादर केला आहे. त्यानुसार सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, चार ते पाच दिवसांत झालेल्या चुकांबाबत स्पष्टीकरण देण्याचा आदेश दिला आहे.

अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करताना बाल न्याय मंडळातील सदस्यांनी निकषांचे पालन केले की नाही? हे पडताळण्यासाठी महिला व बाल विकास विभागाने २२ मे रोजी पाच सदस्यांची समिती नेमली होती.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्यातील तरतुदींनुसार ही समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने त्यांचा १०० पानी अहवाल सादर केला असून त्यानुसार ही नोटीस बजाविण्यात आली आहे.

कल्याणीनगर भागात १९ मे रोजी मद्यधुंद अवस्थेत भरधाव वेगाने पोर्शे कार चालवून दुचाकीला धडक दिल्याने तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एका बिल्डरच्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले होते.या मुलाला बाल न्याय मंडळात हजर करण्यात आले. त्यावेळी अपघातावर ३०० शब्दांचा निबंध लिहिणे, वाहतूक पोलिसांबरोबर पंधरा दिवस वाहतुकीचे नियोजन करणे आणि मद्य सोडायला मदत होईल अशा डॉक्टरांकडून उपचार घ्यावे, या अटींवर त्याला जामीन मंजूर करण्यात आला होता. मात्र, ज्या अटीवर जामीन मंजूर करण्यात आला होता, त्या अटींबाबत देशभरातून उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या होत्या.जामिनाचा आदेश देताना झालेल्या चुका या अहवालात अधोरेखित करण्यात आल्या आहेत. जामिनाचा आदेश सुरूवातीला एका सदस्याने दिला असला तरी, दुसऱ्या दिवशी दुसऱ्या सदस्याने त्याला संमती दिल्याने नियमांची पायमल्ली झाल्याचे अहवालात नमूद आहे.

बाल न्याय मंडळाच्या सदस्यांची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचा सुमारे शंभर पाणी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार संबंधित सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, चार ते पाच दिवसांत स्पष्टीकरण देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या सदस्यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर त्याचा अंतिम अहवाल राज्य शासनाला पाठविण्यात येणार आहे